


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १७ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पुन्हा तेच! एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड

### अहमदाबादहून लंडनला जाणारे विमान रद्द : एअर इंडियाने दिलं स्पष्टीकरण

गेल्या आठवड्यात अहमदाबादमध्ये झालेल्या भीषण विमान अपघातानंतर बरीच खबरदारी घेतली जात आहे. अहमदाबादहूनलंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचे उड्डाण काही समस्या निर्माण झाल्यामुळे रद्द करण्यात आले. उड्डाण रद्द झाल्यामुळे प्रवाशांना खूप त्रास सहन करावा लागला आहे. पण खबरदारीचा उपाय म्हणून त्या विमानाचे उड्डाण न करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, विमान अपघातानंतर पहिल्यांदाच एअर इंडियाचे विमान (AI-




159) लंडनला जाणार होते. परंतु उड्डाणापूर्वी विमानाची तपासणी करण्यात आली आणि काही कारणास्तव उड्डाण रद्द करण्यात आले. हे विमान कधी सुरू होईल याबद्दल कोणतीही माहिती नाही. उद्या या विमानाचे उड्डाण होईल की नाही, याबद्दलही काहीही सांगण्यात आलेले नाही. याबाबत आता एअर इंडियाने स्पष्टीकरण दिले आहे.

एअर इंडियाने म्हटले आहे की, अहमदाबाद ते गॅटविक ही फ्लाइट AI159 आज रद्द करण्यात आली आहे, कारण विमान उपलब्ध नव्हते. हवाई क्षेत्रावरील निर्बंध आणि अतिरिक्त खबरदारीच्या तपासणीमुळे विमान नेहमीपेक्षा जास्त वेळ थांबवण्यात आले. कोणत्याही तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द झालेले नाही. आमच्या प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल आम्हाला खेद आहे आणि त्यांना त्यांच्या डेस्टिनेशनपर्यंत पोहोचवण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली आहे. आम्ही हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था करत आहोत आणि प्रवाशांनी तिकीट रद्द केल्यास पूर्ण परतफेड देखील केली जात आहेत. पण सध्या तरी, १७ जूनच्या दिवसभरासाठी लंडन गॅटविक ते अमृतसर ही फ्लाइट -ख१७० रद्द करण्यात आली आहे.

#### अपघातानंतर विमान क्रमांक बदलला

मिळालेल्या माहितीनुसार, उड्डाण करण्यापूर्वी विमानात एक समस्या आढळून आली. त्यानंतर उड्डाण रद्द करण्यात आले. उड्डाण रद्द झाल्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या अनेक प्रवाशांना खूप त्रास सहन करावा लागला. या विमानातील बहुतेक प्रवासी राजकोट, आणंद, हलोल, खंभात येथील आहेत. विमान रद्द करण्याबाबत प्रवाशांनी सांगितले की, एअर इंडियाच्या टीमने विमान रद्द करण्यात आल्याचे सांगितले. -ख १७१ क्रमांकाऐवजी आता विमानाला AI 159 क्रमांक देण्यात आला आहे.

## शरद पवार म्हणाले, भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७पुणे**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गट एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. त्यादृष्टीने वातावरनिर्मितीही झाली होती. परंतु, ज्या शरद पवारांच्या वक्तव्यामुळे ही सगळी चर्चा सुरु झाली त्यांनीच आता या सगळ्या तर्कवितर्कांना ब्रेक लावणारे वक्तव्य केले आहे. जे सत्तेसाठी भाजपसोबत गेले, अशा संधीसाधू लोकांना आपल्याला सोबत घ्यायचे नाही. गांधी, नेहरु, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे असलेल्यांना सोबत घेऊ, असे शरद पवार यांनी मंगळवारी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलत होते. शरद पवार यांच्या या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता मावळल्याचे





संकेत मिळत आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेणार नाही, असे शरद पवारांनी म्हटल्याचे सांगत अजितदादांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्यावर अजित पवार यांनी, 'प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे', अशी मोघम प्रतिक्रिया दिली. त्यामुळे आता राष्ट्रवादीतील दोन्ही गट एकत्र येण्याच्या प्रक्रियेचं पुढे काय होणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.तुम्ही निवडणुकीची काळजी करु नका. आपल्यासोबत जो येणार असेल, ते आपल्या विचारांशी जोडून राहणार असतील तर त्यांचा विचार वरिष्ठ करतील. मी तुम्हाला विश्वास देतो. आगामी महापालिका निवडणुकीबाबत तुम्ही चिंताच करू नका, असे सांगत शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना धीर देत त्यांना लढण्यासाठी बळ देण्याचा प्रयत्न केला.

## काँग्रेस नात्यागोत्याचा पक्ष झालाय, पक्ष नेतृत्वहीन आहे; अशोक चव्हाणांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदेड**

राज्याचं राजकारण अनिश्चितेचं बनलं असून कधी कोण कुठल्या राजकीय पक्षात आणि कुणासोबत युती करेल हे सांगता येत नाही. नाशिकमधील शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांनी आजच भाजपात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भाजप नेतृत्वावर गंभीर आरोप करणारे, टीका करणारे बडगुजर यांचा भाजप प्रवेश अनेकांसाठी आश्चर्यकारक आहे. दुसरीकडे सांगलीतील काँग्रेस नेत्या आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांच्या नातसुनेनं काँग्रेसचा (उेप-सीर्शीी) हात सोडून भाजपचं कमळ हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावरुन, अनेकांना आश्चर्य वाटत आहे. त्याच संदर्भाने माजी काँग्रेस नेते व विद्यमान भाजप खासदार अशोक चव्हाण यांना प्रश्न विचारला असता त्यांनी काँग्रेस नेतृत्वावर टीका केलीय, काँग्रेस नेतृत्वहीन झाल्याचं चव्हाण यांनी म्हटलं.




दिवंगत वरिष्ठ काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसुनेने सांगलीत काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली असून लवकरच त्या भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणार आहेत. त्याच अनुषंगाने माजी मुख्यमंत्री आणि भाजप खासदार अशोक चव्हाण यांना प्रश्न विचारला असता त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करत, काँग्रेसची अवस्था ही नात्यागोत्याचा पक्ष असल्यासारखी झालीय, असे अशोक चव्हाण यांनी म्हटलं. काँग्रेसकडे प्रेरणा देण्यासारखं काम नाही, रोड मॅप तयार करावा लागतो. अशी टीका चव्हाण यांनी काँग्रेसवर केली. तसेच, काँग्रेस नेतृत्वहीन झाली आहे, हेच यामागचं प्रमुख कारण असल्याचंही त्यांनी सांगितलं.

काँगेसच्या काळात विकास झाला, मात्र त्यापेक्षा दुपटीने मागच्या अकरा वर्षात देशाचा विकास झाला. मी काँगेस मध्येच होतो. काँगेसच्या काळात विकास झाला नाही का या प्रश्नाचा रोख माझ्याकडेच आहे हे मला कळल्याचा टोला अशोक चव्हाण यांनी मारला. काँगेसच्या काळात ही विकास झाला मात्र जो विकास मागच्या अकरा वर्षात झाला तो अधिक गतीने झाला, असं अशोक चव्हाण म्हणाले. आज जमाना आयपीएलचा आहे. त्यामुळे कमी वेळेत लक्ष्य गाठणं महत्त्वाचं आहे, असं अशोक चव्हाण म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकसित भारत २०४७ पर्यंत करण्याचं धोरण ठेवल्याचं अशोक चव्हाण म्हणाले.

## आषाढीच्या रिंगण सोहळ्यात धावणारा 'बलराज' अश्व निघाला; ४० वर्षांपासून सेवा, मोहिते पाटलांना मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७सोलापूर**

पंढरीच्या आषाढी वारीसाठी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान उद्या १८ जून रोजी देहू येथून होत असून यासाठी अकलूज येथील डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांचा बलराज हा अश्व आज पालखी सोहळ्याकडे रवाना झाला. गेले ३५ ते ४० वर्ष मोहिते पाटील यांचा अश्व जगद्गुरूंच्या पालखी सोहळ्यात रिंगणासाठी धावत असतो. मोहिते पाटलांचा हा पताकाधारी अश्व बलराज गेली चार वर्ष जगद्गुरुंच्या सेवेत आहे. बलराज हा मारवाड जातीचा आणि सर्व शुभ लक्षण असणारा देखणा अल्बक आश्व असून




गेली ५ वर्षे तो जगद्गुरूंच्या पालखी सोहळ्यात रिंगणामध्ये पताकाधारी अश्व म्हणून धावत आलेला आहे. आजवर बलराजकडून कोणत्याही भाविकाला कसलीही इजा झालेली नाही. हजारोंच्या गर्दीतही शांतपणे राहणारा हा बलराज पाचव्या वर्षी आता जगद्गुरूंच्या रिंगण सोहळ्यात धावणार आहे.

आषाढी वारीतील लक्षवेधी रिंगणात धावण्यासाठी वर्षभर बलराजला रिंगण सोहळ्याचे प्रशिक्षण देण्यात येत होते. याशिवाय हजारो भाविकांसोबत चालावे लागत असल्याने त्यासाठीचेही विशेष प्रशिक्षणही अश्व बलराजला देण्यात आले आहे. त्यासाठी त्याला वर्षभर हरभरा, गुळ, दुध, तूप, गव्हाचा भूस्सा असा खास खुराक दिला जात होता. आषाढी वारीसाठी रवाना होण्यापूर्वी महिनाभर आधी या खास खुराकाबरोबर शिजवलेली बाजरी, मल्टीव्हिटॅमिन, प्रोटीन व कॅल्शियमयुक्त असे विशेष खाद्य दिले जाते. देहू ते पंढरपूर असा आषाढी पायी वारीचा प्रवास असणारी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी देहुच्या वाड्यातून प्रस्थान होत आहे. या पालखी सोहळ्यात अश्वाच्या रिंगणासाठी मानाचा बाभुळकरांच्या अश्वाबरोबरच पताकाधारी अश्व सेवेचा मान दिवंगत प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी ४० वर्षांपूर्वी सुरु केला. त्यांच्या पश्चात डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या आई पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी अश्वसेवा सुरुच ठेवली आहे.

आषाढी वारीसाठी मोहिते पाटील यांचा बलराज अश्वाची वर्षभर देखभाल अश्व प्रशिक्षक पहात असतात. बलराजची तेलाने मालिश करुन सर्वांग तगडे केले जाते. त्याचबरोबर गोल रिंगणाकरीता धावण्याचं प्रशिक्षणही देण्यात येते. आषाढी वारीसाठी रवाना झालेला बलराज अश्व हा महाराणा प्रताप यांच्याकडे असलेल्या अश्व चेतक याच्या रक्त गटातील आहे. त्यामुळे त्याची विशेष काळजी घेण्यासाठी बरोबर डॉक्टर व ५ जणांची प्रशिक्षक बलराज सोबत रवाना झाले आहेत. वारीच्या वाटेवर त्याला हिरवा चारा, गहू, भुस्सा, दूध, तूप, हरभरा, गुळ असा खुराक सोबत देण्यात आला आहे.

## कृषीसाठी एआय धोरण मंजूर:राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय; आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत कृषीसाठी -ख धोरण मंजूर करण्यात आले. सोबतच आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्यात आली. इतकेच नाही तर ह्यात आता जोडीदारालाही मानधन मिळेल. तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्पातील कंपनीला भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी (डझत) आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. हा लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनर्वसन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार असल्याचे सरकारने म्हटले आहे. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार असल्याचा दावाही करण्यात येत आहे.

## निवडणूक प्रकरणी फडणवीस यांच्यासह पाच आमदारांच्या अर्जावर निर्णय राखून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार मोहन मते, कीर्तिकुमार ऊर्फ बंटी भांगडिया, सुधीर मुनगंटीवार व देवराव भोंगळे यांनी स्वतः विरुद्धच्या निवडणूक याचिका फेटाळून लावण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये दाखल केलेल्या अर्जावर सोमवारी न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्यासमक्ष अंतिम सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने निर्णय




राखून ठेवला. निर्णयाची तारीख जाहीर करण्यात आली नाही.

दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातून जिंकलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध प्रफुल्ल गुडधे, दक्षिण नागपूरमधून जिंकलेले मते यांच्याविरुद्ध गिरीश पांडव, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरमधून जिंकलेले भांगडिया यांच्याविरुद्ध सतीश वारजूरकर, बल्लारपूरमधून विजयी झालेले मुनगंटीवार यांच्याविरुद्ध संतोषसिंग रावत तर, राजुरा येथून जिंकलेले भोंगळे यांच्याविरुद्ध सुभाष धोटे यांनी उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली आहे. निवडणूक आयोगाने ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी विविध कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता केली नाही. त्यामुळे या विजयी उमेदवारांची निवड अवैध ठरवून रद्द करण्यात यावी, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे.

फडणवीस व इतरांचे आक्षेप विजयी उमेदवारांतर्फे वरिष्ठ ॲड. सुनील मनोहर यांनी बाजू मांडताना निवडणूक याचिकांवर विविध आक्षेप घेतले. निवडणूक याचिका लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८१ (१) मधील निकष पूर्ण करीत नाही. त्यामुळे या याचिका दिवाणी प्रक्रिया संहितेतील सातव्या ऑर्डरमधील नियम ११ अंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यातच फेटाळून लावा, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली.

## भाजपमध्ये प्रवेश करताच बडगुजर यांचे ठाकरेंना चॅलेंज

### म्हणाले, पालिका निवडणुकीत दूध का दूध पानी का पानी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नाशिक**

उद्धव ठाकरेंनी हकालपट्टी केलेले नेते सुधाकर बडगुजर यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर बोलताना बडगुजर यांनी चॅलेंज दिले. ते म्हणाले, मी खरंच निष्पाप आहे. समाजाची सेवा करतो. पक्षासाठी खूप काम केले. पण अचानक नियतीने घाला घातला आणि माझ्यावर कारवाई केली. ज्या पक्षाने माझा अनादर केला त्या पक्षाला मी सांगू इच्छितो की महापालिकेच्या निवडणुकीत दूध का दूध पानी का पानी होईल.



मागील अनेक दिवसांपासून पक्षप्रवेशाची चर्चा असलेल्या सुधाकर बडगुजर यांनी आज अखेर भाजपमध्ये प्रवेश केला. विशेष म्हणजे सकाळी त्यांच्या पक्षप्रवेशाबाबत माहिती नाही, असे म्हणणारे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बडगुजर भाजपमध्ये दाखल झाले. यावेळी मंत्री गिरीश महाजनही उपस्थित होते.

## संपादकीय ......

# मरणाचा पूल !

देशात सार्वत्रिक बेपर्वाई सर्वत्र दिसते. सार्वजनिक आणि व्यक्तिगत अशा दोन्ही ठिकाणी त्याचे प्रत्यंतर येते. प्रकल्प पूर्ण केले जातात, अनेकदा त्यात दिरंगाई होते, पूर्ण झाले तरी त्यांची देखभाल नीट होत नाही. सार्वजनिक मालमत्तेचा वापर करताना अनेकदा लोकांचेही भान सुटते. रविवारी मावळ तालुक्यातील इंदोरी येथील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील लोखंडी पादचारी पूल कोसळून झालेली दुर्घटना हे त्याचेच एक ठळक उदाहरण. यात चार पर्यटकांचा मृत्यू झाला आणि १८ जण जखमी झाले. ३८ पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यात आल्याने त्यांचा जीव वाचू शकला. १९९३ मध्ये हा लोखंडी पूल बांधण्यात आला होता.

नदी ओलांडण्यासाठी पुलाचा वापर केला जात होता. त्यावरून स्कूटर, मोटारसायकलही जात होत्या. अलीकडेच हा पूल जीर्ण झाला आणि कोसळला. खरे तर ३०-३२ वर्षांतच हा पूल इतका जीर्ण झाला कसा, हा प्रश्नच आहे. पुलाची अशी 'अवस्था' असल्यामुळे एकच दुचाकी येऊ शकेल, एवढीच त्याची क्षमता. पावसाळी पर्यटनासाठी पूलावर मोठ्या संख्येने पर्यटक आले, पाणी आणि निसर्गाचा आनंद लुटत असताना पूल चाळीसहून अधिक पर्यटक, त्यांची वाहने यांना घेवून क्षणार्धात वाहत्या नदीत कोसळला! अचानक झालेल्या या घटनेने गोंधळ उडाला. अनेकांनी प्रयत्न करून काहीजणांना वाचवण्यात यश आले. वास्तविक पूल जुना झाल्याचे राज्य सरकारला ठाऊक होते. पुलाची अवस्था वाईट ली असून त्याच्या दुरुस्तीसाठी नागरिकांनी सरकारकडे वारंवार विनंती केली होती. गेली आठ वर्षे कित्येकदा तक्रारी करूनही पुलाची पुनर्बांधणी करण्यात आली नाही. साधी डागडुजीही झाली नाही.

मागणीकडे डोळेझाक केली गेली. शेवटी त्याचे पर्यवसान या अपघातात झाले. त्यासाठी आता कोणाला जबाबदार धरणार? संबंधित खात्याला, खात्याच्या अधिकार्यांना की स्थानिक लोकप्रतिनिधींना? हा पूल धोकादायक असल्याचा सूचना फलक पुलाच्या बाजूला लावण्यात आला असला, तरीही तेथे पोलीस का नव्हते, हा प्रश्नच आहे. हा पूल जर धोकादायक होता, तर तेथे अडसर लावून संपूर्ण प्रवेशबंदी का करण्यात आली नाही? मरणाच्या दारात पर्यटकांना का ढकलले गेले? आता या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून, देखभालीबाबत कोणतेही दुर्लक्ष झाल्याचे आढळल्यास, संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे; मात्र काही दिवासंपूर्वी बारामतीत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना, अजित पवार तेथे तातडीने गेले होते; पण इंद्रायणी दुर्घटनेनंतर मात्र ते त्याच दिवशी घटनास्थळी आले नाहीत, असा आरोप करण्यात येत आहे. त्याचे काय ते उत्तर अजित पवार देतीलच. ते येण्या न येण्याने प्रश्न सुटणार नसला तरी राजकीय संवेदनशीलतेचा प्रश्वन उरतोच. त्या जागेवर नवा पूल उभारून आणि राज्यातील अशा मोडक्या पुलांवरील संभाव्य दुर्घटना टाळून ते दाखवतील, अशी आशा आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी राज्यातील जुन्या पुलांचे संरचनात्मक परीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. याआधीही अशा तसेच शंभर वर्षे पूर्ण झालेल्या पुलांचे परीक्षण झाले आहे. त्यावर उपाययोजना त्याही वेळेवर झाल्या तरी अनेकांचे जीव वाचवता येऊ शकतील. इंद्रायणी नदीवरी या पुलाच्या नवीन बांधकामासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात येते; पण राज्य अर्थसंकल्प मांडण्यात येऊन बरेच दिवस उलटून गेले. तरीही याबाबतची वर्क ऑर्डर निघण्यास विलंब लागावा, हे गंभीर आहे.राज्यातील शेकडो पुलांची दुरवस्था असून, त्यांची यापूर्वीच दुरुस्ती करण्याची गरज होती. दर पावसाळ्याच्या आधी अशाप्रकारचे जोखमीचे पूल कोणते, त्यांची तपासणी होऊन ते दुरुस्त झाले पाहिजेत अथवा तेथे ये-जा करण्यास बंदी तरी करण्यात आली पाहिजे. शिवाय अशा जुन्या पूल, साकवांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. संबंधित बांधकाम खाते, पोलिस यांच्यावर वाहतूक सुरक्षेचे काम सोपवले पाहिजे. एवढ्या साध्या साध्या गोष्टी सरकारला का जमत नाहीत? या प्रश्नाला दुसरीही एक बाजू आहे. कुंडमळा येथील इंद्रायणी नदीच्या दुसर्या बाजूला असलेल्या लोकवस्तीतील नागरिकांसाठी रहदारीसाठी हा एकच पूल आहे. याचा अर्थ, त्याची दुरुस्ती तातडीने करण्याची गरज होती. स्वत:च्या सुरक्षेची कोणतीच पर्वा न बाळगता दिसत असूनही या धोक्याच्या दिशेने धाव घेणार्या पर्यटकांचीही चूकही मोठी आहे, असे म्हणावे लागेल. पूल कमजोर आहे, हे माहीत असतानाही पर्यटक पुलावर छायाचित्रे काढण्यासाठी जात आणि थांबत, तेथे रील्स करत बसत. केवळ एक दुचाकी जाईल, एवढीच जागा असताना, दोन्ही बाजूंनी वाहने घेऊन जाणे, रेटारेटी करणे, हेही चुकीचेच आहे. पावसाळ्यात माळशेज, ताम्हीनी, लोणावळा, आंबोली, महाबळेश्वर आदी पर्यटनस्थळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी लोक जातात; पण ज्यावेळी मुसळधार पाऊस असतो, अथवा पूरसदृश स्थिती असते, तेव्हा जाऊ नका, असे सांगूनही लोक तिथे जातात. लोणावळ्याजवळ भुशी डॅमसारख्या ठिकाणी लोक दारू पिऊन धिंगाणा घालतात. समुद्रात वा नदीच्या पाण्यात खोलवर जाऊ नका, असे सांगूनही ते ऐकत नाहीत. डोंगरकड्याच्या टोकावर सेल्फी काढताना पाय घसरून दरीत कोसळतात. माथेरानला धबधब्यात अशाच घटनेत तिघांचा बळी गेला. अशा अनेक घटना गेल्या दोन-तीन वर्षांत घडल्या. तरीही लोकांना अती उत्साहास आवर घालता येत नसेल, तर अशी नवनवी संकटे उद्भवणारच. ती टाळणे इतकेच हाती असते. त्यासाठी शासकीय बेफिकिरी थांबली पाहिजे आणि सर्वसामान्यांनीही, खास करून, तरुणाईने संयमाने वागले पाहिजे. एक माणूस जेव्हा नाहक जीवानिशी जातो, तेव्हा त्याचे अख्खे कुटुंबच संकटात सापडते. म्हणूनच प्रत्येकाने स्वातंत्र्याचा अनुभव घेताना जबाबदारीची जाणीवही ठेवली पाहिजे.

# आयुक्तालयातील १४ पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या

## गुन्हेशाखा युनिट २चा पदभार पीआय संदीप चव्हाण यांच्याकडे रोशन शिरसाट फ्रेजरपुरा तर अतुल वर गाडगेनगर प्रभारी ठाणेदार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी पोलीस आयुक्त कार्यालयातील १४ पोलीस निरीक्षकांच्या सोमवारी रात्री अंतर्गत बदल्या केल्या. यामध्ये गुन्हेशाखा, आर्थिक गुन्हेशाखा आणि शहरातील १० पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच शहराचा आढावा घेतला.त्यानंतर त्यांनी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची अंतर्गत बदली करण्यांचा निर्णय घेतला. दरम्यान सोमवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास त्यांनी आयुक्तालयातील १४ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. यामध्ये गुन्हेशाखा युनिट वनचे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांची आर्थिक गुन्हेशाखेत बदली करण्यात आली.तर त्यांच्या जागेवर संदीप चव्हाण यांची बदली करण्यात आली. तसेच फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार निलेश करें यांची विशेष शाखा तर त्यांच्या जागेवर नव्याने आलेले पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांची बदली करण्यात आली. गाडगेनगर ठाण्याचे ठाणेदार दिनेश दहातोंडे यांची नांदगावपेठ येथे बदली करण्यात आली तर त्यांच्या जागेवर अतुल वर यांची बदली करण्यात आली. तसेच नांदगावपेठचे ठाणेदार महेंद्र अंभोरे यांची सायबर सेलला बदली करण्यात आली. नियंत्रण कक्षाचे पोलीस निरिक्षक हनुमंत गिरमे यांची दंगल नियंत्रण कक्ष, खोलापुरीगेट ठाणेदार गौतम पातारे यांची पोलीस कल्याण शाखेला बदली करण्यात आली. तसेच विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक प्रविण वांगे यांची वाहतुक शाखा येथे बदली करण्यात आली. तर नियंत्रण कक्षाचे पोलीस निरिक्षक निशांत देशमुख यांची राजापेठ ठाणे येथे दुय्यम ठाणेदार म्हणून बदली करण्यात आली. कोतवाली ठाण्याच्या दुय्यम पोलीस निरिक्षक विजया पंधरे यांची गाडगेनगर तर रामदास पालवे यांची कोतवाली ठाण्यात बदली करण्यात आली. तसेच नियंत्रण कक्षाचे दिलीप वडगावकर यांची खोलापुरीगेट ठाण्यात बदली करण्यात आली आहे.









# मधुमेह, हृदयरोग आणि वजन कमी करण्यासाठी सर्वोत्तम पर्याय मखाना जाणून घ्या सविस्तर

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

आपण हलक्या फुल्क्या स्नॅक्सच्या शोधात असतो, पण बऱ्याच वेळा चवीनं खाल्लेलं काहीतरी आरोग्याला अपायकारक ठरू शकतं. अशावेळी जर तुमचा खाण्याचा पर्याय चविष्ट आणि आरोग्यदायी असावा अशी इच्छा असेल, तर मखाना हा एक सर्वोत्तम पर्याय आहे. पॉपकॉर्नसारख्या स्नॅक्सच्या तुलनेत मखान्याचे फायदे अनेक आहेत.



मखाना प्रथिने, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सनी भरलेला असतो. त्यात ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो, त्यामुळे तो मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे. याशिवाय, मखाना ग्लूटेन फ्री असून पचायला सुद्धा सोपा असतो.

**मखान्याचे नियमित सेवन आरोग्यासाठी कसे फायदेशीर?**

**१. हृदयाचे आरोग्य सुधारतो:** मखान्यातील अँटीऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करतात, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका टाळता येतो.

**२. वजन कमी करण्यासाठी उपयुक्त:** मखाना कमी कॅलोरी आणि फॅट असलेला पदार्थ असून त्यात प्रथिने आणि फायबर मुबलक प्रमाणात असतात. यामुळे पोट भरल्यासारखे वाटते आणि जास्त खाण्याची सवय कमी होते.

**३. ब्लड शुगर नियंत्रणात ठेवतो:** ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे मखाना रक्तातील साखरेत अचानक होणारी वाढ थांबवतो. त्यामुळे मधुमेहींसाठी हा एक स्मार्ट स्नॅकिंग पर्याय आहे.

**४. मूत्रपिंडाच्या कार्यक्षमतेत सुधारणा:** मखाना नैसर्गिक ड्युरेटिकप्रमाणे काम करतो. त्यामुळे तो शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यात मदत करतो आणि किडनी हेल्थ सुधारतो.

**५. पचनक्रिया सुधारतो:**

मखान्यात फायबर भरपूर असते, जे मल विसर्जन सुलभ करते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देते.

**६. हाडे मजबूत करतो:**

मखान्यातील कॅल्शियम हाडांची घनता आणि सांध्यांची ताकद वाढवण्यास मदत करते. वृद्ध वयात हाडे मजबूत ठेवण्यासाठी मखाना फायदेशीर ठरतो.

# सूक्ष्म सिंचनासाठी सुवर्णसंधी! शेतकऱ्यांना मिळणार थेट खात्यात अनुदान वाचा सविस्तर

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकऱ्यांच्या पाण्याच्या अडचणी दूर करत उत्पादन वाढवण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या 'प्रति थेंब अधिक पीक' सूक्ष्म सिंचन योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

**पाणी वाचवा; उत्पादन वाढवा!**

'प्रति थेंब अधिक पीक' योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना आता सूक्ष्म सिंचनासाठी मिळणार आहे ९०% पर्यंत अनुदान. थेट खात्यात पैसे, अर्ज प्रक्रिया ऑनलाईन, आणि फक्त ५ हेक्टरपर्यंत शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी. तुमचा शेत समृद्ध करा, अर्ज करा आजच.

योजनेत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात असून, इतर पात्र शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

**काय आहेत योजनेची वैशिष्ट्ये–**

सूक्ष्म सिंचनासाठी २५% ते ९०% पर्यंत अनुदान

* भूधारक शेतकऱ्यांना ५५% व बहुभूधारकांना ४५% अनुदान

* मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेत २५% ते ३०% पूरक अनुदान

* अनुसूचित जातींसाठी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना




* अनुसूचित जमातींसाठी : बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना

५ हेक्टरपर्यंत शेतजमिनीच्या क्षेत्रासाठी योजनेचा लाभ

**अर्ज प्रक्रिया व निवड कशी होते?**

* अर्जदारांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे.

* निवड संगणकीकृत लॉटरी पद्धतीने केली जाते.

* निवड झालेल्या शेतकऱ्यांना डचड द्वारे सूचना दिल्या जातात.

* नंतर शेतकऱ्यांनी अधिकृत वितरकाकडून संच खरेदी करावा लागतो.

* कृषी पर्यवेक्षकांच्या पाहणीअंती अनुदान थेट बँक खात्यात जमा होते.

**खर्च किती?**

* भाजीपाला पिकांसाठी तसेच पिकाच्या प्रकार व लॅटरल अंतरानुसार खर्च वेगवेगळा असतो.

* सर्वसामान्यपणे प्रति हेक्टर ६ ते १० लाख रुपयांपर्यंतचा खर्च मान्य केला जातो.

**आवश्यक कागदपत्रे कोणती?**

* सातबारा उतारा व ८ अ उतारा

* आधारकार्ड, बँक पासबुक, फार्मर आयडी

* सिंचन साधनांची नोंद सातबारावर आवश्यक

* नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्र आवश्यक

**शेतकऱ्यांसाठी सूचना**

या योजनेतून पाणी बचत, खर्च कमी व उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

यासंदर्भात मार्गदर्शनासाठी जिल्हा कृषी अधिकारी, कृषी सहायक किंवा जवळच्या उडउ केंद्राशी संपर्क साधावा.

अर्ज करण्यासाठी वेबसाइट : https://www.mahadbt.maharashtra.gov.in



शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# स्थलांतरित शाळाबाह्य मुलांना जबरदस्तीने शाळेत आणा, मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई–** सर्वत्र शाळा प्रवेशोत्सव होत आहेत, मात्र माझ्यासमोर चिंता आहे ती स्थलांतरित कातकरी कुटुंबातील शाळाबाह्य मुलांची. स्थलांतर करणारी जी आमची मुले आहेत, त्यांचे शिक्षण हे मोठे चॅलेंज आहे. आम्ही मोठ्या प्रमाणात शाळाही सुरू केल्या असून, जिल्हा प्रशासनाने पालकांचे समुपदेशन करून गरज पडल्यास थोडी जोर जबरदस्ती करून ती मुले शाळेत गेलीच पाहिजेत, अशी भूमिका घ्यायला हवी, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील आदिवासी समाजाच्या जीवनामध्ये मूलभूत परिवर्तन करण्यासाठी सुरू केलेली 'धरती आबा' लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ पालघर जिल्ह्यात मनोर येथे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्री गणेश नाईक, कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष विवेक पंडित, राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, पोलिस अधीक्षक यतिश देशमुख उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये ४१०० विद्यार्थी करणार सामूहिक योग

## आरोग्यदायी उपक्रमाची भव्य सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** यंदा अकरावा जागतिक योग दिवस २१ जून २०२५ रोजी साजरा करण्यात येणार असून या जागतिक योग दिनानिमित्त पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती तर्फे भव्य योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे ज्यामध्ये संस्थेच्या स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम येथे महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमाला शिक्षण घेत असलेले ४१०० विद्यार्थी सामूहिकरित्या योगाभ्यास करणार आहेत. यावर्षी एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग (धेसर षी जपश एरींह, जपश क्शरश्रींह) ही थीम पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यासाठी योगास प्रोत्साहन देण्यावर आधारित आहे. या जागतिक थीमला अनुसरून, विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम योगदिनानिमित राबविण्यात येणार आहेत. यामध्ये योगासनांचे प्रात्यक्षिक, प्राणायाम, ध्यानसत्र, तसेच पर्यावरण व आरोग्य याविषयी माहितीपर सादरीकरणांचा समावेश आहे.संस्थेचे संचालक व सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये योगाची सवय निर्माण करणे व एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे असल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होणार असून, हा उपक्रम एक सकारात्मक आरोग्यदायी संदेश देणारा ठरणार आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. १७ जून २०२५

शहर/ग्रामिण


# १५ दिवसांत रद्द होणार ८ हजार जन्म प्रमाणपत्रे

## ३ हजार आदेश मिळाल्यानंतर ते शेवटी गेले कुठे ?

### भाजप नेते किरीट सोमय्यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती** बनावट जन्म प्रमाणपत्रे घेतलेल्या अनेक नागरिकांची प्रमाणपत्रे रद्द करण्याचे आदेश सरकारने १७ मार्च रोजी जारी केले होते. मात्र अमरावती जिल्ह्यात आज पर्यंत नायब तहसीलदारांनी दिलेल्या एकाही आदेशावर कार्यवाही झालेली नाही. मात्र येत्या १५ दिवसांत नायब तहसीलदारांनी दिलेली सर्व ८ हजार जन्म प्रमाणपत्रे रद्द करून घेतली जातील, असा दावा भाजपचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासोबत भाजप नेते

किरीट सोमय्यांनी बैठक घेतली. यामध्ये जिल्ह्यातील बनावट जन्म-मृत्यु प्रमाणपत्र करणी प्रशासनाने आतापर्यंत केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला. तसेच व्याने रुजू झालेले जिल्हाधिकारी आशिष कर आणि पोलीस आयुक्त अरविंदचावरिया यांची भेट घेऊन या प्रकरणात सखोल चौकशीचे निर्देशही त्यांनी दिले.बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना किरिट सोमय्या म्हणाले की, जिल्ह्यातील, आरोग्यविभाग आणि नायबतहसीलदारांनी मिळून आजवर सुमारे ११ हजार जन्म प्रमाणपत्रे जारी केली आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून आली आहे. उदाहरणादाखल अमरावती तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांनी ४५०० पेक्षा जास्त नागरिकांना जन्म प्रमाणपत्र संबंधित आदेश दिले आहेत. पण महापालिकेच्या आरोग्य विभागाला फक्त ५.१६०० अर्जच प्राप्त झाले आहेत. मग उर्वरित ३ हजार प्रमाणपत्रांचे



काय झाले ? ग्रामीण भागात २०० ते ४०० प्रमाणपत्रे तयार करण्यात आली, परंतु किमान २५०० प्रमाणपत्रे शहरी भागातवितरित करण्याचे आदेश दिले गेले होते. मग ती प्रमाणपत्रे गेली कुठे ? संपूर्ण जिल्ह्यात आजवर २०० प्रमाणपत्रेही रद्दकरण्यात आलेली नाहीत. ही स्थिती प्रशासनाने केंद्र सरकारला अहवाल स्वरूपात सादर करावी लागेल. प्रमाणपत्र रद्दीकरणाची गती अत्यंतसंथ आहे, ती वाढवणे गरजेचे आहे. नायब तहसीलदारांना अधिकार नसतानाहीत्यांनी प्रमाणपत्रे जारी केली आहेत. राज्य सरकारने १७ मार्चला अध्यादेश काढून हे प्रमाणपत्ररद्दकरण्याचेनिर्देशदिलेहोते. तरीसुद्धा आदेशात नमूद दिनांकापर्यंतची प्रमाणपत्रे अद्याप रद्द करण्यात आलेली नाहीत. ही स्थिती संपूर्ण जिल्ह्यात आहे. सोमवारी मी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, पोलीस आयुक्त आणि विविध विभागीय अधिकाऱ्यांसोबत बैठक तली. यामध्ये अंजनगाव सूर्जी येथे घडलेल्याप्रकरणावर सविस्तर चर्चा झाली. तिथे सुमारे ६०० आधार कार्ड कशा पद्धतीने वाटप झाले, याची चौकशी राज्य पोलीस प्रशासन आणि आधार प्राधिकरणाकडे मागवण्यात आली आहे. अचलपूर, अंजनगाव, अमरावती या ठिकाणांचा तपशीलवार तपास करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या लोकांनी नायब तहसीलदारांसमोर ह्यमाज्याकडे देशाचानिवासी असल्याचे कोणतेही पुरावे नाहीतह्व असे सांगून अर्ज केला आणि नंतर जन्म दाखला मिळवून इतर कागदपत्रे तयार केली, अशा लोकांचीही तपासणी होणे गरजेचे आहे. त्यातही जे लोक आदेश मिळाल्यानंतरही प्रमाणपत्र घ्यायला आले नाहीत, त्या ३ हजार प्रकरणांची चौकशी आवश्यक असल्याचे किरीट सोमय्यांनी स्पष्ट केले.

# निम्न पेढी प्रकल्प बाधीतांना १०१ कोटीचे सानुग्रह अनुदान मंजूर

## पहिला टप्प्यात ५७.५० कोटी रुपये प्राप्त

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती,**
जिल्ह्यातील दुसरा मोठा प्रकल्प असलेल्या निम्न पेढी प्रकल्पातील बाधितांना १०१ कोटींचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यातील पहिल्या टप्प्यात ५७ कोटी ५० लाख रूपयांचा निधी प्राप्त झाला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने निधी प्राप्त झाला असून त्याचे वाटप होणार लवकरच होणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती येणार आहे. निम्न पेढी प्रकल्पातील पाच गावांच्या पुनर्वसनाला गती देण्यात आली आहे. या गावातील नागरिकांना हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह निधी मिळावा यासाठी गेल्या दहा वर्षांपासून आंदोलने झाली. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याप्रकरणी दखल घेत तातडीने याबाबत बैठक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या सहमतीने निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांना पाच लाख रुपयाचे सानुग्रह अनुदान मंजूर करून प्रकल्पाची वाट मोकळी करून दिली आहे.सानुग्रह निधी ५ गावातील ८४५ लाभार्थ्यांना मिळणार आहे. सध्या या प्रकल्पाला १०१ कोटी रुपये मंजूर झाले असून ५७.५० कोटी रुपयांचा निधी



पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेला आहे. निम्न पेढी प्रकल्पांतर्गत २००६-१३ या कालावधीत सरळ खरेदी प्रक्रियेत एकूण १ हजार ९८१ हेक्टर शेतजमीन संपादित करण्यात आली आहे. संपादित शेतजमीनीकरीता पाच लाख रूपये प्रति एकर सानुग्रह अनुदानाची मागणी करण्यात आली. याबाबत महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने यासंदर्भात अनेक बैठका घेण्यात आल्या. या बैठकीदरम्यान निम्न पेढी प्रकल्पात सुमारे १०१ कोटी रूपयांचा सानुग्रह निधी प्राप्त झाला आहे. प्रथम टप्प्यात प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील हातुर्णा, अळनगाव, गोपगव्हाण, कुंड खुर्द व कुंड सर्जापूर या ५ पुनर्वसित गावासाठी ५७.५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यामुळे आता निम्न पेढी प्रकल्पाला गती येणार आहे.अमरावती, भातकुली व मूर्तिजापूर तालुक्यातील गावांना निम्न पेढी प्रकल्पाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पात सुमो ३ हजार २०० हेक्टर क्षेत्र बुडीत राहणार आहे. या प्रकल्पामुळे ३ तालुक्यासह जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. भातकुली तालुक्यातील पाणीटंचाई दूर होऊन प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, तसेच भाजीपाला पिकांना फायदा होणार आहे.सानुग्रह निधीपोटी मिळालेला ५७.५० कोटी रूपयांचा निधी प्रशासकीय बाबी पूर्ण करून वितरीत करण्यात येणार आहे. सदर निधी पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकाराने प्राप्त झाला आहे. सानुग्रह अनुदान वितरीत करण्याची कारवाई जलसंपदा विभागातर्फे करण्यात येणार आहे. प्रकल्पग्रस्तांनी तातडीने पुनर्वसीत गावात स्थलांतरण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोझरी, कौंडण्यपूर, वलगाव विकास आराखड्यातील कामांचा आढावा

## आराखड्यातील उर्वरित कामे पूर्ण होण्यासाठी नियोजनपूर्वक प्रस्ताव सादर करा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती,**जिल्ह्यात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी श्रीक्षेत्र मोझरी, संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव आणि श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे विकास आराखड्याद्वारे संतांच्या अनुयायी, भक्त, नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देऊन अनेक वैशिष्ट्यपूर्ण कामांना चालना देण्यात आली आहे. विकास आराखड्यातील उर्वरित कामे व नव्याने राबवावयाच्या वैशिष्ट्यपूर्ण कामांबाबत सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विकास आराखडा कार्यकारी समितीच्या अध्यक्षा तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना आज दिले. विविध विकास आराखड्यांबाबत कार्यकारी समितीची बैठक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार राजेश वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपायुक्त (नियोजन) कावेरी नाखले यांच्यासह कार्यान्वयन यंत्रणांचे अधिकारी तसेच मोझरी, वलगाव, कौंडण्यपूर तीर्थक्षेत्र संस्थांचे विश्वस्त, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. सिंघल म्हणाल्या की, आराखड्यातील प्रत्येक काम वैशिष्ट्यपूर्ण आहे.



दर्जेदार सुविधांची निर्मिती याद्वारे होत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या मोझरीच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाने १५० कोटी ८३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. यातून त्याठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आध्यात्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संकुल, ग्रामगीतेवर आधारित ग्रामविकास प्रबोधिनी, ग्रामीण रुग्णालय, स्मृती संग्रहालय, भक्त निवास, महासमाधी सौंदर्यीकरण, बसस्थानक, आयुर्वेदिक रुग्णालय आदी विकासकामे झाली आहेत. पूर्ण झालेल्या इमारतींचे हस्तांतरण तसेच आराखड्यातील उर्वरित कामे लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश डॉ. सिंघल यांनी यावेळी दिले. विठ्ठल-रुक्मीणीचे तीर्थस्थान असलेल्या कौंडण्यपूर क्षेत्राचा विकास आराखडा २० कोटी रुपयांचा आहे. यातून त्याठिकाणी मंदीर परिसरातील विकास कामे, घाट बांधकाम व सौंदर्यीकरण, पर्यटक विसावा, बालोद्यान, प्रवेशव्दार/ रिंगण सोहळा, वाहनतळ, सिमेंट रस्ते, पाणी पुरवठा व जलनिस्सारण कामे, विद्युतीकरण आदी कामांना चालना देण्यात आली. आराखड्यातील उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजन करावे, असे आदेश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले.

संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव विकास आराखड्यांतर्गत ३७ कोटी ८६ लक्ष रुपयांच्या निधीतून विविध कामे राबविण्यात येत आहेत. आराखड्यात पूर संरक्षक भिंतीचे बांधकाम व अस्तित्वातील बांधाची दुरुस्ती-नुतणीकरण, संत गाडगेबाबा समाधीजवळील पेढी नदीवरील घाटाचे बांधकाम, बसस्थानकाचे बांधकाम, समाधीस्थळाचा विकास, समाधीस्थळाच्या बाजूच्या १० एकर जागेतील विकास कामे, भक्त निवास, खुले सभामंडप, वृध्दाश्रम इमारतीचे बांधकाम, वाहनतळ, स्मशानभूमीचा विकास, वलगाव गावठाणातील अंतर्गत रस्ते, नाल्यांचे बांधकाम आदी कामांचा समावेश असून यातील काही कामे पूर्णत्वास गेली आहे. आराखड्यातील उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे डॉ. सिंघल यांनी यावेळी सांगितले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. सिंघल व आमदार श्री. वानखडे यांनी तीनही विकास आराखड्यातील पूर्ण व अपूर्ण कामांचा सविस्तर आढावा घेतला. आराखड्यातील प्रत्येक इमारत बांधकाम व नागरिकांच्या सोयी सुविधांची कामे ही गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असावी, अशा सूचना त्यांनी कार्यान्वयन यंत्रणांना दिल्या.

# धारणीत निरज सोसायटीत २ कोटींचा घोटाळा

## फिक्स व दैनिक ठेविदारांना फटका-कार्यालय बंद, तक्रारी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ धारणी,**
संपूर्ण विदर्भात २२ शाखा असलेल्या निरज अर्बन १७८४ ने आपल्या सर्व कार्यालयांना कुलूप लावून धारणी येथील शाखा पण बंद केल्याने अंदाजे ८०० ग्राहकांना २ कोटीचा फटका बसलेला आहे. फिक्स डिपॉझीट, अल्पबचत आणि दैनिक ठेवीदारांनी आपल्या पैशाच्या निकासीसाठी तक्रार करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे.

धारणी शहरात चार वर्षापूर्वी निरज अर्बन को-ऑप क्रेडीट सोयायटीने आपले कार्यालयातील स्थापिक केलेले होते. स्थानिक व्यापारी, घरगुती महिला, सुकल्या आणि ठेविदारांना आकर्षित करण्यासाठी तर पतसंस्थांपेक्षा जास्त व्याज देण्याचे प्रलोभन संस्थेच्या संचालक व व अध्यक्षांनी दिलेले होते. परिणामी ८०० पेक्षा जास्त लोकांनी खाते उघडून आपल्या घामाचा पैसा जमा

केलेला होता. अनेक व्यापाऱ्यांनी आणि महिलांनी फिक्स डिपॉझीट करून तब्बल एक कोटी रूपये जमा केल्याची गंभीर माहिती आहे. परतवाडा-धारणीच्या मेनरोडवर विशाल कार्यालय असून मालकास भाडे सुध्दा देण्यात आलेले नाही. एका माहितीनुसार, संस्थेचे अध्यक्ष युवराज गिहे तथा उपाध्यक्ष आकाश बोबडे यांच्या विरोधात आर्वी, जि. वर्धा येथून पहिली तक्रार तक्रार झालेली होती. आर्थिक अपराध अंतर्गत गुन्हा कायमहोताच दोघांना अटक करण्यात आलेली होती. त्यानंतर सर्व २२ शाखा बंद करून संस्थेने गाशे गुंडाळले म्हणून प्रत्येक स्थानी ग्राहकांच्या तक्रारी होत आहेत. धारणीत पण जवळपास आठशे ग्राहक असून फिक्स डिपॉझट, दैनिक ठेव, अल्पबचत व इतर स्कीम अंतर्गत लोकांचे २ कोटी रूपये फसल्याची माहिती आहे. धारणीच्या ग्राहकांच्या २ कोटीचा अपहार झाल्याने आता पोलिसात तक्रार करण्याचा निर्णय केलेला आहे. सन अशी की, यापूर्वी अनेकवेळा तालुका वाहेरच्या संस्था, बचत गट आणि क्रेडीट सोसायट्यांनी धारणीकरांना कोट्यावधीचा फटका दिलेला होता. बँकापेक्षा जास्त व्याज दर देणाऱ्यांच्या फसव्या घोषणांवर ग्राहकांनी विश्वास करू नये, असा सल्ला नागरिकांना दिल्या जात आहे.

# जिल्ह्यात कापूस बियाण्यांचे १३ लाख ७५ हजार पाकिटे उपलब्ध

## विशिष्ट वाणांचा आग्रह धरू नका जिल्हाधिकारी यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**
जिल्ह्यात खरीप हंगामात ६ लाख ८६ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी होणार आहे. यात सुमारे २ लाख ५० हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड अपेक्षित आहे. यासाठी १२ लाख ४७ हजार कापूस बियाणे पाकिटाची आवश्यकता भासणार असून त्यानुसार मागणी नोंदविण्यात आली आहे. यानुसार जिल्ह्यात कापूस बियाणांची सर्व वाणांची १३ लाख ७५ हजार पाकीटे उपलब्ध झाली आहेत.जिल्ह्यामध्ये कापूस हे महत्त्वाचे खरीप हंगामातील पिक आहे. खरीप हंगाम २०२५ मध्ये कापूस पिकाच्या होणाऱ्या लागवडीच्या अनुषंगाने जिल्ह्यात एकूण १२ लाख ४७ हजार ५०० कापूस बियाणे पाकिटाची आवश्यकता आहे. त्यानुसार सद्यस्थितीत जिल्ह्यातील सर्व कंपन्यांचे सर्व

वाणांचे मिळून एकूण १३ लाख ७५ हजार ८६३ बियाणे पाकीटे उपलब्ध आहेत. जिल्ह्यामध्ये कापूस बियाण्यांच्याबाबत कोणतीही टंचाई नाही. सर्व वाणांची मिळून मुबलक प्रमाणात बियाणे उपलब्ध आहे. दर्यापूर तालुक्यात कापूस पिकाच्या विशिष्ट कंपनीच्या विशिष्ट वाणाच्या बियाण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. सदर मागणी असलेले वाण हे बीजी टू या प्रकारातील कापसाचे वाण असून यामध्ये कपाशीवरील



किडींना प्रतिरोधक करणारे दोन प्रथिने असतात. मात्र याच प्रकारातील इतर कंपन्यांचे वाण बाजारात उपलब्ध असून त्यामध्ये सुद्धा किडींना प्रतिरोधक करणारे के दोन प्रथिने उपलब्ध आहेत.विविध शिफारसीय वाणांची निवड केल्यास उत्पादनातील स्थिरता टिकवून ठेवण्यास मदत होते. वेगवेगळ्या हवामान आणि जमीन प्रकारांनुसार शिफारसीय वाणांचा निवड केल्यास उत्पादन टिकवून ठेवता येते. एकाच वाणावर भर दिल्यास विशिष्ट कीड व रोगांना संधी मिळते. विविध वाणांचा अवलंब केल्यास रोग प्रतिकारशक्ती वाढते. एकाच वाणामुळे बाजारपेठेत अतिपुरवठा होण्याची शक्यता असते. वाणांचे वैविध्य मूल्य टिकवून ठेवते. तसेच शिफारस केलेले वाण हे संशोधनाआधारे दर्जेदार आणि सुरक्षित असल्याने शेतकऱ्यांनी पर्यायी वाणांचा पेरणीसाठी उपयोग करणे आवश्यक आहे.कापूस पिकाचे अधिक उत्पादन येण्याकरीता विशिष्ट वाणापेक्षा कृषि विद्यापिठाने शिफारस केलेले पिक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर करणे अधिक परिणामकारक असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मागणी असलेल्या विशिष्ट वाणाव्यतिरिक्त इतर वाणांचे सुद्धा उत्पादन चांगले येत असल्याबाबत शेतकऱ्यांचे अनुभव आहेत.

### विशिष्ट वाणांचा आग्रह धरू नका : जिल्हाधिकारी



शेतकऱ्यांनी विशिष्ट कापूस बियाणे वाणाचा आग्रह धरू नये, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. शेतकऱ्यांनी विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये. त्याच प्रकारातील सारखे गुणधर्म असणाऱ्या इतर कंपन्यांच्या बियाणांच्या वाणांची लागवड करण्याकरीता वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# शाळा कधी सुरू होणार?

## नवीन तारीख आणि वेळ जाहीर; सर्वच शाळांसाठी लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**नागपूर दि. १०** –नव्या शैक्षणिक सत्रातील शाळा कोणत्या दिवशी सुरू करायच्या, याचे नेमके आदेश शाळांना प्राप्त न झाल्याने जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती. अखेर माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी आज, १६ जूनला नवे आदेश काढले.



त्यानुसार सर्व शासकीय, अनुदानित आणि खासगी (सीबीएसईसह), सर्वच शाळा २३ जूनला सकाळच्या सत्रात सुरू होणार आहेत. सध्याच्या तापमानाची वाढ बघता २८ जूनपर्यंत शाळा सकाळच्या सत्रात राहणार आहेत. तर ३० जूननंतर नियमित वेळेत सुरू होणार आहेत.

राज्यभरातील शाळांच्या वेळापत्रकात सुधारणा आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने राज्यभरासाठी वेगवेगळे निर्णय गेल्या काही काळात घेतले. ३० एप्रिलपर्यंत भर उन्हात शाळा घेण्यापासून ते १ मे रोजीच सगळे निकाल जाहीर करण्यापर्यंतचे निर्णय याच सुसूत्रीकरणाच्या दाव्यातून घेण्यात आले. यंदाच्या शैक्षणिक सत्रात विदर्भातील शाळा २३ जून रोजी सुरू करण्यात येतील, असे शिक्षण विभागाने राज्यस्तरावरून जाहीर केले होते. २३ ते २८ जूनदरम्यान सकाळी ७ ते दुपारी ११.४५ या वेळेत शाळा घेण्यात यावी. त्यानंतर, ३० जूनपासून नियमित वेळेत वर्ग घ्यावेत, असे शिक्षण संचालनालयाने २९ एप्रिल रोजी काढलेल्या परिपत्रकात म्हटले होते.

राज्याच्या शिक्षण विभागाने आदेश काढले तरी जिल्ह्यातील शाळांसाठी शिक्षणाधिकाऱ्यांना आदेश काढावे लागतात. सर्व शाळा या आदेशांचे पालन करतात. शाळा सुरू होण्यासंदर्भात अद्यापपर्यंत असे कोणतेही आदेश जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने काढलेले नाहीत. त्यामुळे, नेमक्या कोणत्या दिवशी विद्यार्थ्यांना शाळेत बोलवावे याबाबतचा संभ्रम निर्माण झाला होता. अखेर सोमवारी आदेश जाहीर झाले असून २३ ते २८ जूनदरम्यान सकाळी ७ ते दुपारी ११.४५ या वेळेत शाळा राहणार आहेत. तर ३० जूनपासून नियमित वेळेत शाळा सुरू होणार आहेत. तापमानाचा अंदाज लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे हा निर्णय सर्वच शाळांना लागू राहणार आहे.

# मान्सून उद्या राज्य व्यापणार, पण पेरणीची घाई नको

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर–** मोसमी पावसाचे वारे मंगळवारपर्यंत संपूर्ण राज्य व्यापणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांसाठी खात्याने 'रेड अलर्ट' देखील दिला आहे. मात्र, विदर्भात तसेच मराठवाड्यात या आठवड्यात पावसाचा जोर तितका अपेक्षीत नाही. तर पूर्व विदर्भात पाऊस एकंदरीत चांगला झालेला नाही. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांनी ज्यांच्या भागात अद्यापही चांगला पाऊस पडलेला नाही, त्यांनी पेरणीसाठी घाई करु नये, असा सल्ला युकेतील नॅशनल



सेंटर फॉर टमॉस्फेरिक सायन्स येथील संशोधन शास्त्रज्ञ डॉ. अक्षय देवरस यांनी दिला आहे.

मोसमी पाऊस उद्या राज्य व्यापणार म्हणजेच मोसमी पावसाचे वारे येतील. मात्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर वगळता पावसाचा जोर फारसा राहणार नाही. ज्याठिकाणी आधीच जोरदार वादळी पाऊस पडला आहे आणि तापमान कमी आहे, अशा ठिकाणी हा विखुरलेल्या स्वरुपाचा पडणारा पाऊस फायद्याचा राहील. शिवाय विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये समाधानकारक वादळी पाऊस देखील झालेला नाही. सध्या मोसमी पावसाचे वारे येत आहेत. त्यातून आर्द्रता आणि ढगांचे प्रमाण वाढेल. सामान्यपणे विदर्भात बंगालच्या उपसागराकडून कमी दाबाचे पट्टे येत असतात. ज्यामुळे जोरदार पाऊस पडतो. मात्र, या आठवड्यात तरी अशी स्थिती अपेक्षीत नाही. राज्यातील इतर भागांपेक्षा विदर्भात पावसाची तूट अधिक आहे. १५ दिवस उन्ह तापलेले होते. तापमान जवळजवळ ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. शिवाय वादळी पाऊस देखील झालेला नाही. त्यामुळे जमीन अजूनही कोरडी आहे आणि अशा स्थितीत पेरणी होऊ शकत नाही.

> मोसमी पावसापूर्वीच्या वादळी पावसाचा जोर हा विदर्भात आणि प्रामुख्याने पूर्व विदर्भात कमी होता. त्याठिकाणी राज्यातील इतर भागाच्या तुलनेत कमाल तापमान देखील अधिक होते. अशा भागात पेरणीसाठी जोरदार पावसाची गरज आहे. २२ तारखेपर्यंत या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणीची घाई कर नये.
> – **डॉ. अक्षय देवरस,** संशोधन शास्त्रज्ञ, नॅशनल सेंटर फॉर टमॉस्फेरिक सायन्स, युके

# महापालिका आयुक्तांची प्रकृती बिघडली

## जिल्हाधिकारी आशिष येरेकरांकडे प्रभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांची तब्येत बिघडली आहे. त्यामुळे ते अनिश्चित काळासाठी रजेवर गेले आहेत. तथापि, त्यांच्या अनुपस्थितीत महापालिका आयुक्तपदाचा प्रभार जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

उल्लेखनीय असे की, महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रेयांची १० जूनरोजी खा. बळवंत वानखेडे यांच्यासोबत बैठक झाली होती. तेव्हाही त्यांची प्रकृती खराब होती. या बैठकीच्यादुसऱ्या दिवसापासून म्हणजेच ११ जूनपासून महापालिका आयुक्त प्रकृती अस्वास्थ्यामुळे रजेवर आहेत. ते ड्युटीवर कधीपासून रुजू होईल याबद्दल कोणतीही ठोस माहिती नाही. अशा परिस्थितीत महापालिका आयुक्तांची जबाबदारी जिल्हा कारी आशिष येरेकर यांच्या खांद्यावर आली आहे. सरकारने जारी केलेल्यापत्रात असे म्हटले आहे की, आदेश जारी झाल्यापासून पुढील आदेशापर्यंत महापालिका आयुक्त पदाचा कार्यभार जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडेच राहील.





महापालिका आयुक्तांच्या हितचितकांनी त्यांची तब्येत लवकर ठिक होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.–

# नांदगाव पेठ येथील वीज वितरण कार्यालयावर मध्यरात्री धडक!

## प्रा. मोरेश्वर इंगळे यांच्या नेतृत्वात संतप्त ग्रामस्थांचा मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नांदगावपेठ**

गेल्या अनेक दिवसांपासून सतत खंडित होत असलेल्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांचा उद्रेक अखेर रविवारी मध्यरात्री उफाळून आला. प्रा. मोरेश्वर इंगळे यांच्या नेतृत्वात संतप्त ग्रामस्थांनी रात्री १ वाजता वीज वितरण कार्यालयावर धडक दिली, आणि बेजबाबदार प्रशासनाला धारेवर धरले.. महिनाभरापासून वीजपुरवठ्याच्या लपंडावामुळे नागरिक, अबालवृद्ध, लहान मुले प्रचंड त्रस्त झाले आहेत.रविवारी दिवसभर आणि रात्री उशिरापर्यंत विजेचा लपंडाव सुरू होता.संपूर्ण दिवस विजेशिवाय राहल्यानंतर रात्री सुद्धा एक वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने अखेर प्रा. मोरेश्वर इंगळे यांच्या नेतृत्वात



गावकरी वीज वितरण कार्यालयावर धडकले. मात्र, याठिकाणी कोणताही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हता.अभियंता बेहरे यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी अशोभनीय भाषा वापरून नागरिकांचा अपमान केला, ज्यामुळे संतप्त ग्रामस्थ आणखी आक्रमक झाले. कोणताही वादळवारा नसतांना दिवसभर विजेचा लपंडाव सुरू असून खासगी कर्मचाऱ्यांच्या भरवशावर अभियंता बेहरे कारभार सोडून जातात.वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तांत्रिक बिघाड झाल्यास अभियंता बेहरे यांना याबाबत सुद्धा माहिती नसते ही बाब अत्यंत बेजबाबदारपणाची आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरु असून गावकरी नागरिक मात्र या सततच्या वीजपुरवठामुळे संतप्त झाले आहेत.विभागाने नागरिकांच्या या समस्येचा तोडगा काढावा अशी मागणी संतप्त नागरिकांकडून होत आहे.

> **अभियंता बेहरे यांची हकालपट्टी करा**
>
> अभियंता बेहरे यांची तात्काळ हकालपट्टी करून, जनतेच्या सेवेस तत्पर अधिकारी येथे नेमावेत.नागरिकांच्या संयमाचा अंत आता विभागाने बघू नये. वीज वितरण कंपनीने तात्काळ अभियंता बेहरे सारख्या बेजबाबदार अधिकाऱ्यांची बदली करावी अन्यथा वीज वितरण कार्यालय येथे तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> **प्रा. मोरेश्वर इंगळे**

# 'सिंदूर' शेती यशस्वी; एका झाडापासून ५० किलो कुंकू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७जळगाव**

राजवड (ता. पारोळा) येथील शेतात 'सिंदूर' रोपांची यशस्वी लागवड करून माजी आमदार व कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी कृषी क्षेत्रात आगळावेगळा प्रयोग यशस्वी केला आहे. त्यांनी त्यांच्या राज फार्मवर १५ ऑगस्ट २०२३ रोजी सिंदूरच्या ३५ रोपांची लागवड केली होती. साधारणपणे 'सिंदूर' (नैसर्गिक कुंकू उत्पादन देणारे सिंदूर नावाचे झाड)चे उत्पादन हाती येण्यासाठी लागवडीच्या दिवसापासून ३ वर्षांचा कालावधी



लागतो; परंतु लागवड केल्यापासून अवघ्या १५ महिन्यांतच प्रतिवृक्ष १ किलो याप्रमाणे ३५ किलो सिंदूरचे उत्पादन घेण्याचा प्रयोग यशस्वी झाल्याची माहिती त्यांनी दिली. सिंदूरच्या झाडावर लालसर रंगाची फळे (गुच्छ) येतात. फळे कोरडी झाल्यावर बिया काढल्या जातात. या बिया नैसर्गिकरीत्या गडद लालसर रंगाच्या असतात. या बियांमध्ये नैसर्गिक रंगद्रव्य असते, जे सुरक्षित असते. बियांना सावलीत सुकवून नंतर बारीक दळून लालसर पावडर तयार केली जाते. हीच पावडर कुंकू म्हणून वापरली जाते.

# परदेशी बनावटीच्या इलेक्ट्रॉनिक्स सिगारेटचा साठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** प्रतिबंधित असलेला परदेशी बनावटीचा किमंती ईलेक्ट्रॉनिक्स सिगारेटचे विक्री करणारे अवैध्य व्यवसायीक यांचेवर कडक कायदेशीर कारवाईचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा विशेष पथकाने माहीती मिळविली कि, क्रिष्णा नगर, अमरावती येथील राहणारा इसम जय लालचंद लोहाणी हा कॉटन मार्केट रोड ते जयस्तंभ चौक रोडवर भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या परदेशी बनावटीच्यां ईलेक्ट्रॉनिक्स सिगारेटची विकी करित आहे. या माहीती वरून जयस्तंभ चौक येथे पोलिसांनी सापळा लावून जय लोहाणी



(वय ३१ वर्ष, रा. क्रिष्णा नगर, गल्ली नं. ५. शिवाजी नगर) यास पकडले. त्याचा ताब्यातून दोन मोटार सायकली व वेगवेगळ्या कंपनीचे परदेशी बनावटीचे ईलेक्ट्रॉनिक्स सिगारेट असा एकूण ४ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी विरूध्द पोलिस स्टेशन सिटी कोतवाली येथे विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शश्रशलीपळल ललसरीर्शींशी ंशिळशव सदरची कारवाई मा. पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त गुन्हे शिवाजी बचाटे, पोनि. सिमा दाताळकर यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि. इम्रान नायकवडे, सपोउपनि. विनय मोहोड, विनय गुप्ता, छोटेलाल यादव, अजय मिश्रा, मंगेश लोखंडे मंगेश परिमल, संजय भारसाकडे, नईम बेग, चेतन कराडे, रूपेश काळे, लखन खुशराज, नरेश मोहरील, मयुर बोरेकर, रामकृष्ण कांगडे, यांनी केली आहे.

# इर्विन रुग्णालयातून महिलेच्या पर्समधील रोख रक्कम लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–** चिठ्ठी काढण्याकरिता खिडकीसमोर महिला उभी होती. तेव्हा अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समधील रोख १० हजार रुपये लंपास केल्याची घटना इर्विन रुग्णालयात उघडकीस आली. याघटनेत कोतवाली पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.



महिलेच्या पतीचे ऑपरेशन असल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना एक्सरे काढण्याकरिता पाठविले. तेव्हा महिला पतीला घेऊन एक्सरे रुमजवळ गेली आणि चिठ्ठी काढण्याकरिता खिडकीजवळ उभी होती.

दरम्यान, महिलेने पैसे काढण्याकरिता पर्स पाहिली असता पर्सची चेन उघडी दिसली आणि पर्समधील रोख १० हजार रुपये चोरी झालेले दिसताच महिलेने आरडाओरडा केला. त्यामुळे रुग्णालयातील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी




महिलेची समजुत काढून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली. परंतु काही दिसले नाही त्यामुळे महिलेने कोतवाली ठाण्यात तक्रार दिली.



# गरजू विद्यार्थ्यांना होणार शैक्षणिक साहित्याचे निःशुल्क वितरण

## सेवाव्रती बापूसाहेब देशमुख व दानशुर नितीनजी दळवी यांच्या पुढाकारातून अभिनव उपक्रमाचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चांदुरबाजार**

कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या पदस्पर्शाने पावन पुण्यभूमी असलेल्या,श्री गाडगे महाराज संस्था अंतिम श्रध्दास्थान श्रीक्षेत्र नागरवाडी येथिल, संस्थेचे सर्वेसर्वा बापूसाहेब देशमुख तसेच मुंबई येथिल दानशुर व्यक्तीमत्व नितीनजी दळवी व श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे संचालक सागर देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शैक्षणिक वर्षात गरजू विद्यार्थ्यांना जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य निःशुल्क वितरण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

स्वतः निरक्षर असून शिक्षणाचे महत्व अहोरात्र कीर्तनातून सांगणारे वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा वारसा जोपासत, सामाजिक बांधीलकीच्या सद्हेतून अमरावती जिल्ह्यातील गोर-गरीब आदिवासी,अनाथ,दिव्यांग,शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूबांतील शिक्षण घेत असलेल्या गरजू मुलांना, येत्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात संपूर्ण शालेय शैक्षणीक साहित्यांचे मोफत वितरण होणार असल्यांची माहिती संचालक बापूसाहेब देशमुख यांनी नागरवाडी येथे दिली.

प्रामुख्याने गेल्या वर्षी अमरावती,अकोला जिल्ह्यातील ५०५२ गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा प्रत्यक्ष लाभ मिळाला असुन परिस्थिती अभावी शिक्षणापासून वंचीत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देत,खर्या अर्थाने त्यांच्यामध्ये अभ्यासाविषयक अभिरुची निर्माण होवून विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात यावे. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती नाही, शैक्षणिक साहित्याचा सदूपयोगातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेता यावे. याबाबत बापूसाहेब देशमुख नागरवाडी येथे झालेल्या साहित्य वितरणाच्या मिटींग मध्ये ते बोलत होते.यावेळी मुंबई येथिल नितीन दळवी, गाडगे महाराज मिशन मुंबईचे संचालक सागर देशमुख,दर्यापुर बालगृहाचे व्यवस्थापक गजानन देशमुख,व्यवस्थापक प्रकाश महात्मे आदिं शैक्षणिक साहित्य वितरण नियोजनाच्या बैढकीला यावेळी उपस्थित होते.

या भव्य दिव्य शैक्षणिक साहित्याच्या वितरणाला लवकरच सुरुवात होत असुन या साहित्यामध्ये वही, रजीस्टर, कंपास बॉक्स, पेन, पेन्सिल, रबर, शार्पनर,चित्रकला वही,आलेख वही,स्केचपेन, मिठाई, चॉकलेट्स, बिस्किट्स,गरजू महिलांकरीता नविन साड्या, यासह समाजसेवकांच्या सत्काराची माहिती दानशुर नितीन दळवी यांनी या बैढकित दिली.

प्रामुख्याने या शालेय साहित्य मोफत वितरणाचा गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा, विशेषतः गरजू शाळेतील विद्यार्थी निहाय माहिती ३० जुन २०२५ पर्यंत विनंती पत्रासह श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे सादर करावी असे आवाहन संस्थेचे संचालक बापूसाहेब देशमुख यांनी प्रसिध्दी पत्रकातून केले आहे.

# चांदूर बाजार आगारामध्ये नवीन ५ बसेस दाखल

## आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते लोकार्पण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चांदूरबाजार**

चांदूरबाजार आगारामध्ये नवीन पाच बसेस दाखल झाल्या असून या बसेस मुळे प्रवाशांना व विद्यार्थ्यांना सोयीचे झाले आहे. त्यासोबतच आता आगाराच्याही उत्पन्नात भर पडणार असल्याचे प्रतिपादन या नवीन बसेसच्या लोकार्पण सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसटी महामंडळाचे विभागीय वाहतूक नियंत्रक निलेश बेलसरे होते. उद्घाटक म्हणून आमदार प्रवीण तायडे तर प्रमुख अतिथींमध्ये विभागीय वाहतूक अधिकारी योगेश ठाकरे, शहराध्यक्ष टिकू अहिर, मनोज कटारिया, विलास तायवाडे, विजय विलेकर उपस्थित होते. बस स्थानकाच्या परिसरात पाचही नवीन आलेल्या बसेसला सुशोभित करून एकाच लाईन मध्ये लावून बसेस पुढील परिसर रांगोळीने सजून आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. लोकार्पण करून नवीन आलेल्या पाचही बसेसची पाहणी करून, एका गाडीच्या स्टेरिंग वर बसून, बस स्थानकाच्या परिसरात स्वतः चालवून फेरफटका मारला. यावेळी बस स्थानक परिसरात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे म्हणाले, या आगारामध्ये कित्येक वर्षानंतर पाच बसेस आमदारांच्या प्रयत्नाने मिळाल्या असून, पुन्हा पाच बसेस मिळाव्या तसेच या आगारामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा ची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी आमदार महोदयांनी या आगाराकडे लक्ष देण्याची गरज असल्याचेही यावेळी ते म्हणाले. पुढे बोलताना आमदार तायडे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आता शाळेमध्ये जाऊनच विद्यार्थ्यांना पासेस उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना आगारामध्ये जाण्याची आवश्यकता नसल्याचेही ते म्हणाले. यावेळेस आगार प्रमुख प्रवीण डायलकर व यांत्रिक कर्मचारी यांचा आमदारांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच पुण्यावरून बसेस चालवत आणणाऱ्या एसटी चालकांचा सुद्धा यावेळेस सत्कार करण्यात आला. यावेळेस एसटी आगारातील रावसाहेब मकेश्वर, राजेंद्र सोळंके, गौतम बनसोड, विजया चव्हाण, बबीता गव्हाळे, साक्षी दिपटे, अनिल बर्वे, विजय धांडे, प्रमोद घायर, मोहन बिवरे तसेच प्रतीक भुसारी, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळेस उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विजय धांडे तर आभार प्रदर्शन आभार प्रमुख प्रवीण डायल कर यांनी केले.

# दिवसा सुरू असणाऱ्या पथदिव्यांवर महावितरण करणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

महावितरणकडून दिवसा सुरू असणाऱ्या तसेच अनधिकृतपणे वीज जोडलेल्या पथदिव्यांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.त्यासाठी परिमंडळातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. वीजेचा अनाठायी वापर रोखण्यासाठी आणि विजेचा अपव्यय टाळण्यासाठी महावितरणकडून संबंधित विभागांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी पथदिवे दिवसा देखील सर्रास सुरू ठेवले जात असल्याचे निर्दशनास आले असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वीजेचा अपव्यय होत आहे. तसेच काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती किंवा कंत्राटदारांकडून कोणतीही अधिकृत परवानगी न घेता वीज जोडणी करण्यात आली आहे. यामुळे महावितरणच्या आर्थिक उत्पन्नावरही याचा परिणाम होत आहे.शिवाय पथदिवे रात्रदिवस सुरू राहत असल्याने अनाठाई महावितरणच्या यंत्रणेवर याचा भार पडत आहे. वीजेचा वापर योग्य नियोजनाने आणि जबाबदारीने व्हावा यासाठी प्रत्येक विभागाने त्यांच्या अखत्यारितील पथदिव्यांचे योग्य व्यवस्थापन करावे.जेणेकरून ते रात्री सुरू होतील आणि सकाळी बंद होतील.अनधिकृत वीज जोडण्या तात्काळ बंद करण्यात याव्यात आणि दिवसा पथदिवे सुरू ठेवणाऱ्या यंत्रणा तत्काळ दुरुस्त करण्यात याव्यात, अन्यथा कारवाई केली जाणार आहे. कारवाईमध्ये अनाधिकृत विजेचा वापर आढल्यास संबंधित विभागावर विद्युत कायदा २००३ नुसार वीजेचा अपव्यय आणि अनाधिकृत वापराबाबत कारवाई केली जाणार आहे, तसेच दिवसा सुरू असणाऱ्या पथदिव्याचे सर्व साहित्य महावितरणकडून जप्त करण्यात येणार आहे.

# मोर्शीमधून गाड्या सुसाटः जयस्तंभ चौक येथे टिनाच्या शेडला उडविले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मोर्शी**

शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून रस्त्यावर गाडी पार्क करणे, राँग साईड गाडी चालवणे हे नित्याचेच झाले आहे. त्याचबरोबर फळे, भाजीपाला घेऊन जाणारे आयशर व ट्रक सुसाट वेगाने शहरातून धावत आहे. या अतिवेगामुळे एखाद्या वेळेस मोठा अपघात मोर्शी शहरात घडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, तसेच १५ जूनरोजी रात्री बाराच्या दरम्यान जयस्तंभचौकातील रस्ता दुभाजकाजवळ असलेल्या दिलखूष पान सेंटर, मामा पानं सेंटर व इतर दोन दुकानांच्या टीनशेडला सुसाट वेगात असलेल्या ट्रकने धडक देवून हजारो रुपयांचे नुकसान केल्याची घटना मोर्शी शहरात घडली आहे.

जयस्तंभ चौक हा रहदारीचा चौक असून या ठिकाणी नेहमी नागरिकांची मोठी गर्दी असते. याच रस्त्यावर गाड्या सुसाटवेगाने धावत असल्याने दुपारच्यावेळेस अशी घटना घडल्यास मोठा अनुचित प्रकार घडू शकतो.मोर्शी शहर हे तालुक्याचे ठिकाण असून मोठी बाजारपेठ आहे. या शहरातूनच अमरावती, नागपूरतसेच परतवाडा या मोठ्या शहराकडे जाणारा रस्ता असल्याने या रस्त्यावरच मोठी वाहतूक राहते. शहरातील अनेक कार्यालय याच रस्त्यावर असल्याने नागरिकाची मोठी गर्दी असतेः परंतु मागील काही महिन्यापासून या रस्त्यावरूनच सुसाट वेगाने गाड्या धावत असल्याचे दिसून येते. सकाळच्या वेळेस भाजीपाला व फळांच्या रस्त्यावरून धावताना दिसून येतात. यात अवैध गुरांच्या गाड्यासुद्धा असतात, अशी चर्चा शहरात राहते. मोर्शी शहरात अवैध प्रवाशी वाहतूकसुद्धा मोठ्याप्रमाणात वाढली असून अवैध रेती व गुरांची वाहने मोठ्या प्रमाणात चालतात. यावर शहरातील वाहतूक पोलिस कारवाई करीत नसल्याने एखाद्या वेळेस मोठा अपघात घडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

# आर्किटेक्चर डिप्लोमा अभ्यासक्रम इच्छुक विद्यार्थ्यांकरिता अंतिम सुवर्णसंधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे मागील वर्षापासून (२०२३-२४) सुरू असलेल्या कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर मान्य आर्किटेक्चर व इंटिरियर डिझाईन या तीन वर्षांच्या डिप्लोमा अभ्यासक्रमांसाठी १०वी उत्तीर्ण विद्यार्थी थेट प्रवेश घेऊ शकतात, प्रवेश परीक्षेची आवश्यकता नाही.

या अभ्यासक्रमांना COA (नवी दिल्ली), चडइढए आणि महाराष्ट्र शासन मान्यता आहे. आर्किटेक्चर व इंटिरियर डिझाईनसह विविध तांत्रिक डिप्लोमा अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

प्रवेश प्रक्रिया CAP द्वारे राबवली जात आहे. याकरिता नोंदणी अंतिम दि १६जून२०२५ होती. याप्रवेश प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी या दिवशी डॉ मोहितकर संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र यांचे अध्यक्षतेखाली सर्व संलग्नित संस्था प्राचार्यासोबत बैठक घेण्यात आली. यानुसार सर्व विद्यार्थ्यांच्या हितासाठी नोंदणी व कागदपत्र पडताळणीची अंतिम तारीख आता २६ जून २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे असे प्राचार्य संजय देशमुख यांनी कळवले आहे.

विद्यार्थ्यांसाठी या कोर्समुळे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरी, स्वतंत्र व्यवसाय, आणि उच्च शिक्षणासाठी अनेक संधी उपलब्ध होतात. तरी या संधीचा दहावी पास इच्छुक विद्यार्थी, सिव्हिल पदविका/पदवीधारक,शिक्षण खंडित व गृहिणी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे.

नोंदणी संकेतस्थळ: poly25.dte.maharashtra.gov.in Diploma in architecture आणि Diploma Interior Design अभ्यासक्रमाविषयी अधिक जाणून घेण्याकरिता संपर्क करा: ८८३०५१८४३१ / ९९७५४५२२३९

# दर्यापूरचे ब्रिटिश कालीन झाडांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात जाणार

## वनविभागाच्या उच्च अधिकाऱ्या कडून नव्याने वय निश्चित करण्यात यावे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७दर्यापूर**

जलवृक्ष चळवळीचे संकल्पक विजय विल्हेकर व तमाम जलवृक्ष प्रेमींच्या पुढाकाराने गेल्या आठ वर्षापासून एसटी डेपो ते शिवाजीनगर रोडवरील ब्रिटिश कालीन झाडे.जपल्या गेली पाहिजे.यासाठी झाडांना वस्त्र परिधान करून,झाडांचा वाढदिवस शेणाचा केक कापून साजरे केलेत. ८० /९० वर्षाच्या शेकडो नागरिकांकडून शपथ पत्र लिहून घेतले की,ही झाडे शंभर वर्षांपूर्वीचे आहेत.या उपक्रमातून झाडांच्या वयाची जाणीव करून दिली.जेणेकरून वन प्रशासनाचे लक्ष वारसा वृक्षा कडे गेले पाहिजे.पण वनक्षेत्र अधिकारी परतवाडा यांनी झाडांचे वय दहा वर्ष ते २७ वर्ष. दोन झाडांचे ४२ वर्ष. असा अहवाल दिला. त्यामुळे तब्बल आठ वारसा वृक्ष कापली गेली वृक्ष संवे.जलवृक्ष चळवळीने झाडांची अंत्ययात्रा काढून, झाडांचे तेरवी भोजन देऊन वृक्ष संवेदना व्यक्त केल्यात.वृक्ष कटाई प्रकरणात दर्यापूर न्यायालयात दाद मागितली.मा. न्यायाधीश दर्यापूर यांनी झाडांची कटाई न करण्याचा मनाई हुकूम दिला. जलवृक्ष प्रेमींना दिलासा मिळाला. नगरपालिका प्रशासनाने जिल्हा न्यायालय अचलपूर यांच्या न्यायकक्षे मध्ये मनाई हुकुम रद्द केला. जलवृक्ष चळवळीच्या वतीने मा.हायकोर्टामध्ये प्रकरण दाखल केले. माननीय उच्च न्यायालय नागपूर यांनी मनाई हुकूम दिला. नगरपालिकेने वृक्ष प्राधिकरणाचा ८० ८५ वर्षाचा अहवाल असताना वनविभागाचा झाडांच्या वयाचा चुकीचा अहवाल सादर करून हाय कोर्टाची दिशाभूल केली.मा.उच्च न्यायालयाने मनाई हुकुम रद्द केला.आता जलवृक्ष चळवळीच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दर्यापूरच्या वृक्ष वय चोरी प्रकरण दाखल करणार. सर्वोच्च न्यायालय या पुराण वृक्षांना न्याय देईल या प्रतीक्षेत दर्यापूरचे तमाम वृक्ष प्रेमी वाट पाहत आहे.दर्यापूर ही भूमी वेदना संत गाडगेबाबा,डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांची भूमी आहे. संत गाडगेबाबांनी कित्येकदा झाडाखालचा रस्ता झाडून काढला असेल. डॉक्टर भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या कित्येक सभा या झाडांच्या सावलीत घेतल्या असतील. हा या झाडांच्या सावलीचा इतिहास आहे. दर्यापूरकरांना सार्थ अभिमान असलेले.याच दर्यापूर भूमितील विधी विद्वान सुपुत्र,सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय भूषणजी गवई सर. रा. सू. गवईकाका,कमलआई यांचे बोट धरून या झाडांच्या सावलीतून चालले असतील कदाचित. अशी भावना विजय विल्हेकर यांनी व्यक्त केली.वनविभाग अधिकारी परीक्षेत्र परतवाडा यांनी पौराणिक झाडांचा चुकीचा अहवाल देणे. हे वन रक्षकाचे काम नसून वन भक्षकाचे काम आहे आणि वनविभागाच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या ब्रीदपदा ऐवजी वृक्षवल्ली हेच आमचे खरे वैरीअशी करावी का?असा प्रश्न विजय विल्हेकर यांनी उपस्थित केला.या झाडांच्या सावलीत बालपणी खेळलेले वन अधिकारी मित्र ज्याचं वन विकास प्रबोधनाचे कार्य जागतिक पातळीवर सन्मानपूर्वक प्रमाणित आहे. त्यांनी सुद्धा या चुकीच्या अहवाला संदर्भात अत्यंत खेद व्यक्त केला.मा.सर्वोच्च न्यायालयाने वनविभागाच्या उच्च अधिकार्याकडून झाडाच्या वयाचे मूल्यांकन करून देण्यात यावे. ही विनंती करण्यात आली.वनविभागाने चुकीच्या अहवालाचा निषेध म्हणून आज दिनांक १४ रोजी याच प्राचीन झाडांच्या सावलीत निंदा निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बंडू शर्मा,एड. विद्यासागर वानखडे,अनिरुद्ध वानखडे, दर्शन दीपक गवई,मालिनी पाटील, वर्षा अग्रवाल,संगीता पुंडे,अँड सुजाता वानखडे,गजानन देशमुख, शशांक देशपांडे,गजानन देवके,शरद रोहनकर,रमेश भले,सदानंद तिडके,सुभाष कीटे,मनोज रेखे,सुभाष वडुरकर,शिवाजी गोमाशे,कराळे, छत्रधर कुंभारकर,प्रकाश धर्माळे,रवी गावंडे,प्रवीण गवई,सचिन रवराळे,निलेश गव्हाळे,राजेंद्र अटाळकर,प्रवीण तायडे,प्रशांत तायडे,प्रदीप साखरे,दिलदार शहा,रहमान शहा,जुबेर शहा,कासम शहा, गोपाल वानखडे,शेख कासम, अरबाज पठाण,आनंदराव ठाकरे ई.हजर होते.

# रेल्वे वॅगन दुरुस्ती कारखान्यातील कामगारांच्या समस्या सोडवणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

राष्ट्रीय रेल्वे मजदूर युनियनचे महामंत्री वेणू पी. नायर यांचे नुकतेच अमरावती एक्सप्रेसने बडनेरा रेल्वे स्थानकावर आगमन झाले. त्यांचे एनआरएमयूच्या कॉमरेड्सने जल्लोशात स्वागत केले. त्यानंतर एनआरएमयू शाखा बडनेरा येथून बाइक रॅली काढण्यात आली.

बडनेरा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दुचाकी रॅलीने ते वॅगन दुरुस्ती कारखान्यात पोहोचले. येथे वैभव नंदागवळी, वानखडे आणि महिलांकडून त्यांचे जल्लोशात स्वागत करण्यात आले. या वेळी महामंत्री नायर यांनी कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेत संपूर्ण वॅगन दुरुस्ती कारखान्याची प्रत्यक्ष पाहणी केली. कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्याची ग्वाही देऊन त्यांना आश्वस्त केले. नायर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना एकतेने काम करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर सायंकाळी ५ वाजता युनियन ऑफीसमध्ये शाखेचे अध्यक्ष एन. एम. शेख, शाखा सचिव एम. एस. लोहकरे, शाखा कोषाध्यक्ष व्ही. एस. चारदेवे, संघटन सचिव मनोज साटनकर, सर्व पदाधिकारी तसेच कर्मचारी यांनी त्यांचा सत्कार केला. नायर यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. या सर्व कार्यक्रमाला नायर यांच्यासोबत मुंबई मुख्यालयातून बाळा गांगुर्डे, भुसावळ येथील मंडल सचिव बापू पाटील, भवानी शंकर, अतुल हांडे, ख्वाजा, शाखेचे महिला नेतृत्व रुपाली मनोज साखरे, अर्चना सागोळे, विणा गणवीर, ऑगस्टिन अलेक्झांडर, धम्मलाल डोंगरे, चतुर्वेदी, नितीन गोंडाणे, प्रफुल्ल मेश्राम आणि कॉम्रेड उपस्थित होते.

# बच्चू कडू यांना तीन दिवसांनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज : प्रकृती ठणठणीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**



शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध १७ मागण्यांसाठी गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व माजी मंत्री बच्चू कडू यांची प्रकृती तीन दिवसांपूर्वी खालावली होती. त्यामुळे त्यांना तातडीने अमरावतीच्या एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.त्यानंतर तीन दिवस उपचार घेऊन आता त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. डॉक्टरांनी सर्व वैद्यकीय चाचण्या पूर्ण करून त्यांना आज दुपारी रुग्णालयातून डिस्चार्ज दिला. सध्या बच्चू कडू यांची तब्येत पूर्णपणे ठणठणीत असून काही दिवस त्यांनी विश्रांती घ्यावी असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.कडू सध्या कुरळपूर्णा येथील आपल्या निवासस्थानी आराम करत आहेत. मात्र लवकरच ते पुन्हा जनतेच्या सेवेसाठी कार्यरत होतील, अशी माहिती त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली. आंदोलनाच्या काळात त्यांनी तब्बल चार दिवस अन्नत्याग केला होता. त्यामुळे शरीरात अशक्तपणा जाणवत होता. त्यांची प्रकृती स्थिर होताच त्यांनी रुग्णालयातून सुटका घेऊन विश्रांतीचा मार्ग पत्करला.

# मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात संततधार पावसाचा इशारा

## संभाव्य आपत्ती लक्ष्यात घेता प्रशासन सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

दक्षिण-पश्चिम मान्सूनने यंदा महाराष्ट्रात वेगाने आगेकूच करत अवघ्या आठवड्याभरात संपूर्ण राज्य व्यापले आहे. कोकणापासून ते विदर्भ पर्यंत आणि घाटमाथ्यापासून मराठवाड्याच्या पठारापर्यंत सर्वच विभागांत पावसाची नोंद झाली असून, पावसाचा जोर कमीअधिक प्रमाणात कायम आहे. भारतीय हवामान खात्याच्या (खचऊ) अधिकृत माहितीनुसार, राज्यात १० जूनपासून मान्सूनने राज्यात प्रवेश केला असून १४ जूनपर्यंत तो संपूर्ण महाराष्ट्रात सक्रिय झाला आहे. यामुळे शेतकरी, नागरिक व प्रशासन यांना दिलासा मिळाला आहे.



मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात संततधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पालघर येथे ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, कोकण व मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने आजपासून उद्यापर्यंत कोकण व मध्य महाराष्ट्रात यलो ते ऑरेंज अलर्ट जारी केला असून, रेड अलर्ट देखील काही किनारी भागांसाठी देण्यात आला आहे. विजेचा कडकडाट, वारा, आणि जल भरावाचे धोके लक्षात घेता नागरिकांनी प्रवास टाळावा, सुरक्षित ठिकाणी राहावे, आणि प्रशासनाच्या मार्गदर्शनाचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शहरांमध्ये पाणी तुंबणे, वाहतूक विस्कळीत होणे, झाडे कोसळणे इत्यादी संभाव्य आपत्तींवर प्रशासन सज्ज असून, सतर्क राहण्याची सूचना देखील देण्यात आली आहे.

**कोकणात दमदार सुरुवात**

कोकण विभागात सर्वात आधी मान्सून दाखल होतो. यंदाही त्याला अपवाद नाही. मान्सूनचा सर्वप्रथम प्रवेश केरळ मार्गे झाला आणि त्यानंतर तो गोवा ओलांडून ९ जूनच्या सुमारास सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात पोहोचला. त्यानंतर अल्पच वेळात रायगड, पालघर व मुंबईत त्याने दमदार हजेरी लावली. मुंबईत १२ जूनपासून सतत पावसाच्या सरी कोसळत असून, १३ जूनला उपनगरांमध्ये ११० मिमी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. मुंबई महापालिकेने पाणी तुंबण्याच्या ठिकाणी तत्काळ पंपिंग सुरू केले असून, लोकल सेवा काहीसा उशिराने धावत आहे.

**विदर्भात यलो अलर्ट जारी**

विदर्भात देखील मान्सूनने जोरदार हजेरी लावली आहे. नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, अमरावती, वर्धा, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत ११ जूनपासून पावसाचे प्रमाण वाढले आहे. यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यांत काही ठिकाणी ८० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. नागपूर शहरात पावसामुळे काही ठिकाणी झाडे कोसळली आहेत. हवामान खात्याने विदर्भातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला असून विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. नागरिकांनी घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**धरणांमधील पाणी साठ्यात वाढ**

राज्यातील अनेक मोठ्या धरणांमध्ये आता पाणीसाठा वाढू लागला आहे. कोयना, वरसगाव, पानशेत, मुळा, उजनी, जायकवाडी, नागझरी, चांदणी, मांजरा यांसारख्या धरणांमध्ये पाण्याची पातळी हळूहळू वाढत आहे. सध्या सरासरी १५-२५% इतकाच साठा असला तरी सुरुवातीच्या पावसाने जलसंपदा विभागात समाधान व्यक्त केले आहे. जर जून महिन्यात अखेरचा आठवडा दमदार गेला तर ऑगस्टपूर्वी पुरेसा साठा निर्माण होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीत बसले किरीट सोमय्या?

## हा बिनपगारी फुल अधिकारी कोणी नेमला? काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा संतप्त सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७वर्धा**

किरीट सोमय्या कुठल्या अधिकारात वर्धा उपजिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा ताबा घेऊन, खुर्चीत बसून अधिकार गाजवत आहे? असा संतप्त सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे. या संबंधी सपकाळ यांनी सोमय्या यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील केली आहे.



भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांचा एक फोटो सध्या समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे. यामध्ये ते वर्धा उपजिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बसलेले दिसत आहेत. यात ते उपजिल्हाधिकऱ्यांच्या खुर्चीवर बसले असल्याचा आरोप होत आहे. यावरुन सपकाळ यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा बिनपगारी फुल अधिकारी कोणी नेमला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

वर्धा येथे उपजिल्हाधिकाऱ्यांच्या खुर्चीत भाजपचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या जोर जबरदस्तीने बसून कारभार हाकत असल्याचा आरोप करत सोमय्या यांचा एक फोटो सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. यावरुन विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सोमय्या भाजपवर टीका केली आहे.

भाजपचे किरीट सोमय्या यांनी रोहिंग्या मुस्लिमांच्या दाखल्याच्या विरोधात मोहीम उघडली आहे. राज्यात भाजपची सत्ता असल्याने मनमानी पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन ते आढावा घेत असल्याचा आरोप यात करण्यात येत आहे. त्यांनी यासाठी सोमवारी वर्धा जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात आढावा घेतला. या वेळी ते अधिकाऱ्यांच्या खुर्चीत बसले असल्याचा आरोप होत आहे.

# लेकराची काळजी आहे की नाही; स्कूल बसचे योग्यता प्रमाणपत्र कोण तपासणार?

## आरटीओ उगारणार कारवाईचा बडगा: अनेक चालकांकडे योग्यता प्रमाणपत्रच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात झाली असून, शहरातील काही शाळा सुरू झाल्या आहेत. तर, काही शाळा २३ जूनपासून सुरू होणार आहेत. मुलांच्या सुरक्षित वाहतुकीची जबाबदारी स्कूल बसेस आणि व्हॅनवर असते. परंतु, अद्यापही अनेकांनी बसचे योग्यता किंवा फिटनेस प्रमाणपत्र नूतनीकरण केलेले नाही. ही बाब पालकांसाठी चिंताजनक ठरत आहे.



स्कूल बसचे योग्यता प्रमाणपत्र तपासणाऱ्या यंत्रणेने याकडे गांभीर्यान लक्ष पुरवावे, अशी मागणी होत आहे. शहरात वाहन तपासणीसाठी आरटीओ प्रशासनाकडून दरवर्षी विशेष मोहीम राबविली जाते. मात्र, प्रत्यक्षात अनेक चालक आणि बस मालक वार्षिक तपासणीपासून त्यांच्याकडील वाहनांची स्थिती, ब्रेकिंग सिस्टीम, आपत्कालीन साधने, चालकांची पार्श्वभूमी तपासली जात नसल्याचे वास्तव आहे. मात्र यामुळे मुलांची सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता आहे.(बॉक्स)पालकांनी स्कूल बस किंवा स्कूल व्हॅनच्या कागदपत्रांची चौकशी करावी, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, चालक परवाना, इन्शुरन्स इत्यादी वैध असल्याची खात्री करावी.बसमध्ये प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र, जीपीएस ट्रॅकर, स्पीड गव्हर्नर आणि आपत्कालीन बाहेर पडण्याचे दरवाजे व्यवस्थित आहेत की नाही, याची तपासणी करावी.

# पावसाळ्यात ग्रामीण भागात जीर्ण घरांचा धोका! जिल्ह्यात मातीचे घरे 'जैसे थे', अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी ग्रामस्थांची कसरत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मोर्शी**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात घरकुल योजनेची लाभार्थ्यांना लॉटरी लागली पावसाळ्यापूर्वी आहे. घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याची घाई सुरू आहे. परंतु, मातीचे जुने व जीर्ण घर 'जैसे थे' ठेवण्यात येत असल्याने ही घरे पावसाळ्यात धोकादायक ठरत आहेत. लहान मुले खेळताना भिंती कोसळल्याने जखमी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. ग्रामपंचायत स्तरावर तातडीने मातीचेनिकामी घरे भुईसपाट करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे. जिल्ह्यातील ग्रामीण परिसरात प्रत्येक गावांत अशी जीर्ण घरे निदर्शनास येत आहेत.



पावसाळ्यापूर्वी घरकुलांचे बांधकामाला गती लाभार्थ्यांकडून दिली जात आहे. घरकुल योजनेचा लाभ घेताना बहुतांश लाभार्थ्यांनी जुने मातीची जीर्ण घरे जैसे थे ठेवली आहेत. नव्या घरात प्रवेश केल्यानंतर लाभार्थी जुन्या जीर्ण घराकडे ढुंकूनही पाहत नाही. यानंतर पावसाळ्याचे पाणी जीर्ण घरांचे भिंतीवर कोसळत असल्याने भिंती कोसळत आहेत. ही घरे पावसाळ्यात आणि अन्य ऋतूत धोकादायक ठरत असतात.

**अतिवृष्टीच्या लाभासाठी खटपट**

पावसाळ्यात दरवर्षी अतिवृष्टी होत असल्याने शासन स्तरावरून घरे आणि भिंती कोसळल्याचे सर्वेक्षणाचे आदेश दिले जात आहेत. भिंती अथवा घरे कोसळल्यास शासन स्तरावरून नुकसान भरपाई दिली जात आहे. एकच भिंतीला अनेक वेळा मदत दिली गेली आहे. घरांच्या चार भिंती असताना चारही भिंतीचे वेगवेगळे अनुदान लाटण्यात आले आहे. यामुळे मातीचे जीर्ण घरे वास्तव्यास नसताना लाभार्थी भुईसपाट करीत नाहीत. पावसाळ्यात अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची खटपट सुरू झाली आहे. धोकादायक भिंती आणि घरे असताना लाभार्थी मनावर घेत नाही. कुणाचे जीव गेले तरी चालेल, असेच चित्र ग्रामीण भागात दिसून आले आहे.

# बॉम्ब ठेवल्याचा फोन, नागपूर येथे विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

कोचीहून दिल्लीकडे निघालेल्या इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याचा फोन आल्यानंतर या विमानाचे नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग मंगळवारी सकाळी करण्यात आले.




विमानामध्ये बॉम्ब ठेवल्याचा फोन आल्यानंतर नागपुरात विमानाचे लँडिंग करवण्यात आले आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्ष्यात घेता सध्या विमानाची तपासणी सुरू करण्यात आली आहे. नागपूर पोलीस आणि अग्निशमन दल विमानतळावर दाखल झाले असून विमानाची तपासणी सुरू आहे. मात्र या प्रकरणामुळे एअरपोर्टवर काही वेळ एकच पळापळ आणि गोंधळ उडाल्याचे बघायला मिळाले आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, गेल्या वीस मिनिटापूर्वी विमान नागपूर विमानतळावर उतरलं आहे.

तपासादरम्यान काहीही धोकादायक वस्तू आढळलेली नाही. मात्र पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले असून ते कसून तपास सध्या करत आहे. प्राप्त माहितीनुसार, हे विमान सकाळी ९.२०वाजता कोचीहून निघालेले आणि दुपारी १२:३५ वाजता दिल्लीत उतरणारे होतं. अशातच विमानातील अधिकाऱ्यांना धोकादायक इशारा मिळाल्यानंतर हे विमान नागपूरला वळवण्यात आले. कोची विमानतळावरील अधिकाऱ्यांनी या धोक्याची पुष्टी केली, ज्यामुळे आपत्कालीन प्रोटोकॉल वाढवण्यात आले आणि सुरक्षा एजन्सींशी तात्काळ समन्वय साधण्यात आला.गुजरातच्या विमान दुर्घटनेनंतर अशा धमकीच्या फोन ने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

# जबरी चोरी प्रकरणातील दोघांना इंदला येथून अटक

## १ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त, फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

इंदला फाट्यानजीक एका युवकाला चाकूचा धाक दाखवत मोबाईल, रोख रक्कम व गाडी हिसकावणाऱ्या दोघा आरोपींना फ्रेजरपुरा पोलिसांनी अवघ्या सहा तासांत अटक केली. आरोपींकडून एकूण १ लाख ६० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पुष्पल नावाडे(१९, रा. शेगाव नाका) हा तरुण १४ जून रोजी रात्री १०.३० वाजता मोपेडवर मित्राची वाट पाहत होता. त्यावेळी पल्सरवर आलेल्या दोघांनी त्याला बाजूच्या लेआउटमध्ये नेऊन चाकूचा धाक दाखवून पैसे मागितले. मित्राकडून फोन पे द्वारे ३ हजार रुपये पाठवून घेतले गेले. आरोपींनी मोबाईल आणि गाडी घेऊन त्यातून पैसे काढले आणि परत



करताना हा प्रकार कोणाला सांगितला तर जीव घेऊ अशी धमकी दिली.फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला. सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी इंदला गावातून इजानोद्दीन पठाण (२२) आणि आमीर खान (३०) यांना अटक केली. यावेळी आरोपींच्या ताब्यातून ३ हजार रुपये रोख, चायना चाकू, ८० हजारांची पल्सर मोटरसायकल, ५० हजारांचा आयफोन आणि ५०० चे घड्याळ असा एकूण १.६० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त सागर पाटील, सहा. आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट व त्यांच्या पथकाने केली.

# शहरातील प्रत्येक प्रभागात युवक कॅाग्रेस राबविणार स्वच्छता अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शहरातील अनेक भागात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असून रोगराईचा धोका निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाच्या उदासीनतेमुळे लाखो शहरवासीयांच्या आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला आहे. सामान्य जनतेला भेडसावत असलेल्या या महत्वाच्या समस्यांकडे लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेसच्या वतीने 'शहर स्वच्छता अभियान' ही अभिनव मोहिम हाती घेण्यात आली आहे. आपलं शहर, आपली जबाबदारी या ब्रीदवाक्यानुसार या मोहिमेअंतर्गत शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून, स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवून परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्याचा मुख्य उद्देश आहे.देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि. १९ जून, गुरुवार रोजी सकाळी ९.०० वाजता या अभियानाची सुरुवात होणार आहे. स्वच्छतेचा मूलमंत्र देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या गाडगेनगर येथील प्रतिमेला अभिवादन करून या माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर कॉंग्रेस अध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, माजी महापौर मिलिंदभाऊ चिमोटे, प्रदेश कॉंग्रेस उपाध्यक्ष भैय्याजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहीमेला सुरुवात करण्यात येणार आहे. यानंतर आठवड्यातील प्रत्येक रविवारी शहरातील विविध भागात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

# आसेगाव पूर्णा येथे सामुदाय महापारायण सोहळा संपन्न




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७आसेगाव पूर्णा**

श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे महापारायण आसेगाव पूर्णा येथे संपन्न झाले. मुखोद्गत बाल पारायणकार कु. सुरभी भाग्यश्री सुनील ढगे रा. पुणे हिच्या सुमधुर वाणीतून महापारायण पूर्ण झाले. आसेगाव पूर्णा परिसरातील महिला वर्ग व भाविक भक्त मोठ्या प्रमाणात यावेळी उपस्थित होते. या महापारायण सोहळ्यामध्ये जवळपास एक हजार महिला गजानन भक्तांनी सहभाग घेऊन विजय ग्रंथाचे वाचन केले. मुखोद्गत बाल पारायणकार कु. सुरभी भाग्यश्री सुनील ढगे ही फक्त नऊ वर्षाची बालिका असून संपूर्ण विजय ग्रंथ तिला मुखोद्गत आहे. कोरोना काळामध्ये विद्याताई पडवळ यांचे पारायण यूट्यूब वर ऐकून व आपला अभ्यास सांभाळत वयाच्या सातव्या वर्षी महाराजांच्या कृपेने तिला संपूर्ण पारायण मुखोद्गत झाले. सौ.अनुश्री निखिल ठाकरे यांचा विनंती व निमंत्रणावरून तिने आसेगाव पूर्णा येथे श्री गजानन विजयग्रंथ महापारायण सेवा दिली. या सोहळ्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, दिलीप पाटील धोंडे, प्रकाश पाटील ठाकरे उपस्थित होते. यावेळी मंच सेवेकरी शीतल पुंड, प्रमोद कराळे गुरुजी, विजय गणवीर, वृषभ चुंभळे, शारदा भागवतकर, श्रेयस वैध यांनी सेवा दिली.महापारायण सोहळ्याचे आयोजनाकरिता सुषमा बर्वे, आशाताई गोटे, सुनिता मानकर, संगीता साबळे, शारदा करडे, प्रणिता उपाशे, अर्चना बोबडे, शालिनी भोरे, रंजना भुजाडे, मीनाक्षी बोबडे, ज्योती वैद्य, सुचिता चिथोरे, उषा मोहोड, सौरभ दिवाण, राहुल डवरे, पंकज वैराळे, सुरज काटोलकर, सचिन भुयार, प्रवीण ठाकरे, वैभव बर्वे, गजेंद्र फुके, सचिन वाटाणे, शिवशंकर घुरडे, तेजस भुजबळ, आशिष अब्रूक, योगेश ठाकरे, संदीप मोहोड, अमोल इंगळे, दीपक ठाकरे, अतुल वैद्य, निलेश पुसतकर, नयन वैद्य, सतीश गोरखेडे, गिरीश बंड, रोशन लेंडे यांचेसह निखिल ठाकरे मित्रमंडळ व परिसरातील श्री. गजानन भक्तांनी योगदान दिले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींशी भेटून भावविभोर झाले चांदूरबाजारचे तातेड कुटुंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७जसापूर**

युरोपमधील एका छोट्या देशातील सायप्रसच्या लिमासोल शहरात सोमवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाले. सायप्रस देशामध्ये सुमारे ४ ते ५ हजार भारतीय राहत आहेत. सायप्रसमधील भारतीय वंशाच्या नागरिकांनी पतप्रधानांचे' वंदे मातरम्' नारे लावत अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वागत केले.

चांदूरबाजार येथील भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व माजी तालुकाअध्यक्ष चंद्रशेखर लालचंदतातेह यांचे सुपुत्रप्रशम तातेड हे गेल्या ७ वर्षापासून सायप्रसमधील एका बहुराष्ट्रीय



कंपनीत कार्यरत आहेत. आपल्या मोठ्या भावाला भेटण्यासाठी ८ दिवसांपूर्वीच प्रेरित तातेड हेदेखील आपल्या कुटुंबासह सुट्टी घालवण्याकरिता सायप्रसला गेले होते. तातेड कुटुंबातील सदस्यांना पंतप्रधान मोदीजीना भेटण्याचीसुवर्णसंधी प्राप्त झाली.

पंतप्रधान मोदी यांच्या सोबत झालेल्या भेटीत प्रशम तातेड यांचे सुपुत्र समकित यांच्या डोक्यावर हात ठेवून मोदीजीनी शुभाशीर्वाद दिला. त्यानंतर त्यांना आपल्या कडेवर सुद्धा घेतले आणि आपल्या या चिमुकल्या चाहत्यावर भरपूर प्रेम करत चलो इंडिया असे म्हटले. त्याचप्रमाणे, प्रेरित तातेड यांची कन्या चि. संयती हिच्या गालावर थपकी देत मोदीजींनी डोक्यावर हात फिरवून मोठ्या प्रेमाने लाड केले. जेव्हा प्रेरित तातेड यांनी मोदीजींना वाकून नमस्कार केला, तेव्हा त्यांनी त्यांना त्वरित उचलून खांद्यावर हात ठेवून स्नेहयुक्त आशीर्वाद दिला.

प्रशम तातेड यांनी सांगितले की, 'मोदीजी, आम्ही आपल्यावर खूप प्रेम करतो आणि त्यानंतर जोरात जय जिनेंद्र मोदीजी अत्सानारा दिला. हा नारा ऐकून मोदीजींनी स्वतः ही मोठ्या आवाजात 'जय जिनेंद्र असे प्रति उत्तर दिले. त्याचप्रमाणे तातेड कुटुंबातील दोन्ही सूनबाई सौ. शिवाली तातेड व सौ. सुरभी तातेड यांचे अभिवादनही मोदीजींनी अत्यंत आत्मीयतेने स्वीकारले आणि त्यांच्या बुकवर स्वाक्षरीही केली. पंतप्रधान मोदी यांची भेट झाल्याने चांदूर बाजारचा तातेड कुटुंब अत्यंत गौरवान्वित व भावविभोर झाले आहे.